



# छात्र प्रबोधन

सौर पौष, शके १९३६ । वर्ष १५ अंक ४


वार्षिक वर्गणी ₹ २००/ मूल्य ₹ २०







ज्ञान प्रबोधिनीचे
कुमारांसाठी,
कृतिशीलता
जोपासणारे मासिक!



## हे वीर विवेकानंद

हे वीर विवेकानंद हिंदुयशमूर्ती
हे युवकप्रवर तू युवहृदयांची स्फूर्ती ।। ध्रु. ।।

दास्यात पाहुनी विश्वधर्मजननी ही
तू क्षुब्ध सिंहसा व्याकुळ अंतर्यामी
मु  तीचा तिचिया ध्यास तुला दिनराती ।। १ ।।

शत आघातांनी कुंठित मूर्च्छित झाली
ती हिंदुचेतना फिरून तू चेतविली
तिज उन्नत मस्तक निर्भय केले जगती ।। २ ।।

स्मरतात तुझे ते घनगर्जितसे शब्द
'मन वज्र हवे अन् मनगट ते पोलाद'
जग जिंकायाची ईर्ष्या दाटो चित्ती ।। ३ ।।

तव अमृतवाणी हाक देत आम्हाते
रे अतुल बलस्वी करू हिंदुराष्टाते
युवश ति हवी मज कार्यशरण पुरुषार्थी ।। ४ ।।

जी जीवनपुष्पे सतेज नव र  ताची
स्थापावा त्यांनी धर्म आत्म अर्पूनी
त्यानेच अर्चना होत राष्टदेवाची ।। ५ ।।

# छात्र प्रबोधन

**सौर पौष, शके १९३६। वर्ष १५ अंक ४**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २७० वा अंक, वर्ष २३ अंक ६

**प्रकाशन दिनांक – सौर ११ पौष, शके १९३६/१ जानेवारी २०१५**


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

## • अंतरंग •


४. **संवाद** – महेन्द्र सेठिया

५. माहितीपर... **'१३ ग्रेनेडिअर्स...'** – कर्नल अविनाश केळकर

८. कविता... **सुंदर फसवी गंमत** – आश्लेषा महाजन

९. कथा... **भुताचा वाडा** – मीनाक्षी केतकर

१३. माहितीपर... **पानगळ व पान प्रकल्प** – वाच. कांचनगंगा गंधे

१८. ललित... **पाढ्यांचं गाणं** – मल्हार अरणकल्ले

२०. प्रासंगिक... **आशिया मधल्या शांतिदूतांना नोबेल**

२१. प्रासंगिक... **'स्वच्छ भारत' अभियान संदेश**

२२. सद्य घडामोडी...
**नव्या महाराष्ट्र सरकारपुढील आव्हाने** – ऐश्वर्या शेवाळे

२५. मुलांचे पान.. **सोडवा हे शब्दकोडे** – कु. मृण्मयी फडके
**अंधाराचे गाणे...** – कु. शिवानी वाबळे

२७. एकांकिका... **ज्ञानेश्वरी** – गायत्री मुळे

३३. कविता... **वसा** – वंदना धर्माधिकारी

मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य...
**हे वीर विवेकानंद** – वाच. स्वर्णलता भिशीकर

**याशिवाय** – हसा हसा... (१२), किस्से शास्त्रज्ञांचे (१७), संक्रांतिच्या शुभेच्छा, सौर दिनदर्शिकेविषयी, स्पर्धा निवेदन (३३), प्रतिसादी वाचकवीर व्हा ९, हार्दिक अभिनंदन, छात्र प्रबोधन वर्गणीतील बदल (३४)


या अंकातील पानाखालच्या ओळी प्रजासत्ताक दिनानिमित्त (२६ जानेवारी) देशभक्तिपर आहेत.

**तळटिपेतील ओळी** – 'अवश्य वाचावीत' अशा काही पुस्तकांची नावे दिली आहेत.

**मुखपृष्ठाविषयी**

२६ जानेवारी... भारताचा प्रजासत्ताकदिन! प्रजासत्ताकदिनानिमित्ताने दिल्लीतील लाल किल्ल्यासमोर होणाऱ्या संचलन व प्रात्यक्षिकातील काही दृश्यांच्या प्रकाशचित्रांचे 'कोलाज' तुमच्या मनात देशाभिमानाची भावना जागी करेल.

**– भरत केतकर**


**♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦**
महेन्द्र सेठिया

**♦ कार्यकारी संपादक ♦**
शिल्पा कुलकर्णी

**♦ संपादक मंडळ ♦**
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
वाच. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

**♦ मुखपृष्ठ ♦**
भरत केतकर

**♦ आतील चित्रे ♦**
भरत केतकर



**♦ संपर्क पत्ता ♦**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org

**ई–मेल**
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org



**मासिकाची वर्गणी**
वार्षिक: ₹ २००, द्वैवार्षिक: ₹ ४००,
त्रैवार्षिक: ₹ ५५०,
दशवार्षिक: ₹ १,७००.
**या अंकाची किंमत : ₹ २०**
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा, घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४० जादा)



**या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही रक्कम प्राप्त झाली आहे.
परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतीलच असे नाही.**


**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

**जरूर वाचा : एका रानवेड्याची शोधयात्रा – ले. कृष्णमेघ कुंटे,** निसर्गवेडानं झपाटलेल्या रानवेड्याचं पुस्तक, राजहंस प्रकाशन

## संवाद

**स्वच्छताप्रिय प्रबोधकांनो,**

आपापल्या शाळांमध्ये क्रीडा महोत्सव, स्नेहसंमेलने, शिबिरे–सहली इ. उत्साहवर्धक उपक्रमांची धामधूम चालू असेल किंवा नुकतीच झाली असेल. निव्वळ प्रेक्षक होऊन टाळ्या वाजवण्यापेक्षा किंवा शेल या प्रतिक्रिया (कॉमेंटस्) देण्यापेक्षा कशात ना कशात तरी तुम्ही सहभागी झालात ना? आणि तुम्ही नुसतेच सहभागी झालात की तयारी करून भाग घेतला, की जिंकण्याच्या, उत्कृष्ट कार्यक्रम सादर करण्याच्या ईर्ष्येने, पुढाकार घेऊन, जबाबदारी घेऊन सहभागी झालात? स्वत:च्या क्षमता ओळखण्यासाठी, वापरण्यासाठी, ताणण्यासाठी या उपक्रमांमध्ये मनापासून पुढच्या पुढच्या टप्प्यांवर सहभागी व्हा ! तरच त्यातल्या आठवणी तुम्हाला दीर्घकाळ प्रोत्साहन देत राहतील.

मा. प्रंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी केलेल्या 'स्वच्छ भारत' अभियानाबद्दल वर्तमानपत्रांमधून व दूरचित्रवाणीच्या विविध वाहिन्यांमधून तुम्ही पुष्कळ वाचलं–ऐकलं असेल. आवाहनाला प्रतिसाद म्हणून प्रतिकात्मक स्वच्छता मोहीम राबवणे, स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यासाठी फलक घेऊन व घोषणा देत फेरी काढणे या गोष्टी ठिकठिकाणी सुरू झाल्या आहेत. ते चांगलेच आहे; पण पुरेसे न कीच नाही. स्वच्छतेची कृती एकदा करणे ही पहिली पायरी झाली. ती कृती आपल्या अंगवळणी पडणे, सवयीची होणे, रोजची होणे ही त्याच्या पुढची पायरी. आठवड्याभराचा कचरा वर्गात तसाच ठेवायचा अन् आठवड्यातून किंवा महिन्यातून एकदा स्वच्छता मोहीम म्हणून वर्गाची साफसफाई करायची, हे बरोबर होईल का? तेव्हा आपले घर / आपली सोसायटी/आपली शाळा/आपला वर्ग यांची स्वच्छता रोज व्हायलाच हवी. खरं त्यासाठी वेगळ्या मामा–मावशींची गरज आहे का? जपानमधील शाळांमध्ये एकही सफाई कामगार नाही आणि तरीही शाळांची स्वच्छता वाखाणण्याजोगी ! हे भारतात, महाराष्ट्रात , आपल्या गावात, आपल्या शाळेत केव्हा घडू शकेल? स्वत: स्वच्छता करायला सुरूवात करू तेव्हा ! त्यातूनच आपण नकळतपणे अस्वच्छता कमी करायला शिकतो. शाळेचा वर्ग झाडायला लागलो की मग पडलेले कागदाचे बोळे, खडूंचे तुकडे, रंगांचे डाग, डब्यातील सांडलेले अन्नपदार्थ दिसायला लागतात. ते त्रासदायक व्हायला लागतात आणि निदान 'आपण तरी असला कचरा करायचा नाही' असं आपण ठरवायला लागू. दुसरा कुणी करत असेल तर त्याला समजवून सांगू. वेळप्रसंगी विरोध करून ती कृती थांबवायचा प्रयत्न करू. पण त्यासाठी स्वच्छतेची कृती स्वत: करायला हवी अन् ती नियमितपणे व्हायला हवी. त्याची सुरुवात घरापासून, तुमच्या खोलीपासून करायला हरकत नाही. हळूहळू नियमित स्वच्छतेची सवय लागली की (मग ती वैयि तिक स्वच्छता असो की वस्तू, वास्तू, परिसर यांची स्वच्छता असो)अस्वच्छता दिसू लागते, ती खटकू लागते, ती करू नये यासाठी आग्रह धरायला सुरुवात होते.

परवा राजगडला गेलो होतो. तेथे तुमच्या वयाची १००–१२५ मुले आली होती. पंधरावीस मिनिटे मी गटाचे निरीक्षण करत होतो. गडावर आधी येऊन गेलेल्या गटाने पुष्कळ कचरा केला होता. ३०–४० विद्यार्थ्यांनी आपल्याकडील चॉकलेटस् , बिस्किटचे पुडे खोलून त्याची वेस्टणे तेथेच टाकली अन् कचऱ्यात भरच घातली. काही विद्यार्थी कचऱ्याकडे कानाडोळा करून बसले. मोज या ५–१० विद्यार्थ्यांनी आपल्या चॉकलेट, बिस्किटांची वेस्टणे आपल्या पिशवीत ठेवली. २–४ विद्यार्थ्यांनी परिसरातला कचरा गोळा करून एका ठिकाणी एकत्र करून ठेवला. यातील कोणतीच गोष्ट त्यांच्या शिक्षकांनी त्यांना सांगितली नव्हती. 'चला रे, सगळा कचरा उचलूया' असे त्यांच्या शिक्षकांनी म्हटले असते तर सगळी वानरसेना आनंदाने सगळा कचरा एकत्र करण्यात गुंग झाली असती. पण मग आपण आज्ञेची/कोणी सांगण्याची वाट पाहणार की सवयीचा भाग म्हणून, स्वत:हून पुढाकार घेऊन स्वच्छता करणार? मला असं वाटतं सवयीचं रूपांतर 'स्वच्छता' हे मूल्य म्हणून होण्यात, आग्रह म्हणून धरण्यात झालं तर मग कोणी सांगण्याची आपण वाट बघणार नाही. स्वच्छता मोहिमेपासून 'स्वच्छता' हा आग्रह, स्वभाव, स्थायी भाव, मूल्य होण्यापर्यंत तुम्हा सर्वांचा प्रवास होवो, यासाठी तुम्हाला मनापासून शुभेच्छा !

या देशाची मान खाली जाईल, येथील पर्यावरणाला घातक होईल, येथील जनजीवनाला त्रास होईल अशी कोणतीही अस्वच्छता (वैयि तिक/सार्वजनिक) आम्ही करणार नाही, इतरांना करू देणार नाही. **स्वच्छतेकडून सुंदरतेकडे प्रवास करू,** असा संकल्प २६ जानेवारी, प्रजासत्ताकदिनाच्या निमित्ताने आपण सगळे मिळून करूया.

मकरसंक्रांतीला स्नेहाचे–आपुलकीचे वर्तुळ वाढवत असतानाच असा स्वच्छतेकडे नेणाऱ्या संक्रमणाचा कृतिरूप संकल्प करूया. खूप खूप शुभेच्छांसह...

**तुमचा दादा,**

**(महेन्द्र सेठिया)**



**नीच न कोणी उच्च न कोणी। हाच आपुला धर्म खरोखर, हीच आपुली शाश्वत वाणी।।**

**जरूर वाचा : इट्स नॉट अबाउट द बाइक** – अनु.–अंजली नरवणे, जगप्रसिद्ध सायकलपटूचे आत्मकथन, मेहता पब्लिशिंग.

**प्रायोजक – डॉ. कीर्ती आपटे, पुणे** – दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

# ‘१३ ग्रेनेडिअर्स’
## अभिमानास्पद पाचशे पन्नास वर्षे

**– कर्नल अविनाश केळकर**




**भारतीय सेनादलातील इन्फंट्री बटालियनची कामगिरी गौरवास्पद आहे. १३ ग्रेनेडियर्स (गंगा जैसलमेर) या बटालियनला नुकतीच ५५० वर्षे पूर्ण झाली. या बटालियनचे कमांडिंग ऑफिसर म्हणून ज्यांनी नेतृत्व केले ते कर्नल अविनाश केळकर (निवृत्त), आपल्याला या बटालियनचा इतिहास, सैनिकांचे वाळवंटातील खडतर प्रशिक्षण आणि त्यांनी केलेली कामगिरी यांविषयी सोबतच्या लेखात सांगत आहेत.**

विविध मोहिमा हाताळणाऱ्या बटालियनचं नेतृत्व करणं हे इन्फंट्री बटालियन (पायदळ) मध्ये दाखल होणाऱ्या प्रत्येक *ऑफिसरचं* एक ध्येय असतं. माझ्या सैन्यदलातील कारकिर्दीत हा सन्मान मला बहाल करण्यात आला. मी शौर्य आणि कार्यक्षमता यांसाठी गौरवण्यात येणाऱ्या भारतीय भूसेनेतील ‘१३ ग्रेनेडिअर्स’ (गंगा जैसलमेर) या बटालियनचं *कमांडिंग ऑफिसर* म्हणून नेतृत्व केलं.

१३ ग्रेनेडिअर्स (गंगा जैसलमेर) या बटालियनला ५५० वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे. पायदळातील अन्य कुठल्याही *युनिटला* इतका समृद्ध वारसा आणि इतिहास  वचितच लाभलेला आहे.

या *युनिटबद्दल* थोड यात सांगायचं, तर या बटालियनमधल्या शूर जवानांची पाळंमुळं राज्यस्थानच्या वाळवंटात खोलवर रुजलेली आहेत. इ. स. १४६५ मध्ये मारवाडमध्ये प्रिन्स राव बिकाजी याने आपले स्वत:चे राज्य स्थापन करण्यासाठी ५०० सैनिकांसह एक पथक स्थापन केले. त्यावेळी त्यास ‘बीकानेर रिसाल’ म्हणत. यामध्ये उंटांचे एक स्वतंत्र दल होते. नंतरचे महाराज गंगा सिंग यांच्या नावाने हे दल ‘गंगा रिसाल’ म्हणून ओळखले जाऊ लागले. कालांतराने ‘गंगा’ आणि ‘जैसलमेर रिसाला’ एकत्र होऊन भारतीय सेनादलात ‘१३ ग्रेनेडियर्स (गंगा जैसलमेर)’ म्हणून सामील झाले. या मरुभूमीच्या पुत्रांबरोबर काम करण्याची दुर्मीळ संधी मला माझ्या सैनिकी जीवनात मिळाली हे मी माझे भाग्य समजतो.

वाळवंटाचं निरीक्षण सहजतेनं करताना ती अतिशय आश्चर्यकारक आणि तरी सौंदर्यपूर्ण अशी भूमी वाटते. तिथे तयार झालेले रमणीय भूआकार, तिथले असाधारण वन्यजीवन आणि जगामध्ये  वचित आढळणारी आगळी वेगळी वनस्पतीसृष्टी यांचा तो प्रभाव असतो. तिथे सूर्य अक्षरश: निष्ठुरतेनं धगधगत असतो. सावल्या–धु याचा आभास निर्माण करीत असतात. मनात कोणत्याही शंका न ठेवता वाळवंटाला भेट देणाऱ्या, वर्दीधारी नसलेल्या सामान्य प्रवाशाला ते नेहमीच अविस्मरणीय वाटत आलं आहे. वाळवंटात सफारीसाठी किंवा एखादी रात्र तंबूत मौजमजा करण्यासाठी येणाऱ्यांच्या हातून घडणारी एखादी चूक जीवघेणी ठरू शकते. काही प्रसंगात मृत्यूसुद्धा घडतात.

‘थार’ च्या वाळवंटाला ‘मरुस्थली’ (Land of the dead) असेसुद्धा ओळखले जाते. भारतीय उपमहाद्वीपाच्या वायव्येकडील हा प्रदेश म्हणजे विस्तीर्ण अशी वैराण भूमी आहे. भारत आणि पाकिस्तान यांमधील ती नैसर्गिक सीमारेषा आहे. दोन लाख चौरस किलोमीटरपेक्षा जास्त भूमी वाळवंटाने व्यापली आहे. विस्ताराच्या दृष्टीने जगातील नवव्या क्रमांकाचे हे उष्ण वाळवंट आहे. अथांग पसरलेल्या वाळूच्या समुद्रात अधूनमधून छोट्या टेकड्या विखुरलेल्या दिसतात. पावसाच्या अभावाने शुष्क झालेल्या या भूमीचे वाऱ्यामुळे ‘अपरदन’ म्हणजेच झीज झाल्याचे आढळते. गतिमान वाऱ्यांच्या मार्गात अडथळा आल्यावर वाऱ्याने वाहून



भिन्नतेत या अभिन्न, आज गाऊ आरती। कोटी हस्त, कोटी पाद, हृदय एक भारती।।

जरूर वाचा : आसमंत - ले. श्रीकांत इंगळहळीकर, आसमंत बघण्याची वेगळी दृष्टी देणारे ललितलेख, करोला पब्लिकेशन्स

प्रायोजक - बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे

आणलेली वाळू खाली बसते आणि छोटी टेकडी तयार होते. वाऱ्याच्या साहाय्यानं सरकणाऱ्या या वाळूच्या टेकड्या वाळवंटात बघायला मिळतात. स्थानीय वाऱ्यांच्या दिशेशी ९०°चा कोन करून या टेकड्या तयार होतात. म्हणजे वारे पूर्वेकडून येत असतील तर, टेकड्या उत्तरेकडून दक्षिणेकडे सरकतात. वाऱ्याचा जोर इतका प्रचंड असतो की कोणत्याही पाऊलखुणांचा मागमूसही राहात नाही आणि त्यामुळे माग काढणं, रस्ता शोधणं अधिक कठीण होऊन जातं.

वाळवंटात दिवस अतिशय उष्ण तर रात्री थंड असतात. उन्हाळ्यातील कमाल तापमान ६०° से. पर्यंत चढू शकते. रात्रीच्या वेळी तापमापकाचा पारा खूपच खाली उतरतो. या विषमतेत शरीरातील पाणी कमी होण्याचा *(डिहायड्रेशन)* जबरदस्त धोका असतो. पावसाळ्यात पुरात सापडलेल्या लोकांच्या कथा आपल्याला भरपूर ऐकायला मिळतात. पण वाळवंटातील कठोर आणि तीव्र अशा वातावरणाचा अंदाज आम जनतेला अजिबात नसतो.

सैनिकांना रात्रीच्यावेळी वाळवंटातील सैनिकी हालचालीसंबंधी विशेष प्रशिक्षण दिले जाते. दिवसाच्या उष्णतेपासून बचाव करणे आणि रात्रीच्या थंडीपासून स्वत:ला सुरक्षित ठेवणे याचा समतोल ज्याला साधतो; तोच या वाळवंटात तग धरून राहू शकतो. जिवंत राहाण्यासाठी जवळचा पाण्याचा साठा योग्य त्या प्रमाणात वापरणे, वेळप्रसंगी भुकेच्या भावनेवर मात करणे आणि जवळपास आढळणाऱ्या खाद्याचा जिवंत राहण्यासाठी उपयोग करून घेणे; हासुद्धा आमच्या प्रशिक्षणाचा एक भागच असतो.

वाळवंटातील सैन्यतुकडीला कैक दिवस अन्न आणि पाण्याचा पुरेसा साठा बाळगून प्राप्त परिस्थितीशी जमवून घ्यावं लागतं. याबरोबरच 'दिशा ज्ञान' ही वाळवंटातील सर्वात मोठी समस्या असते. कारण मैलोगणती पसरलेल्या वाळूच्या समुद्रात उजवी बाजू, डावी बाजू असं काही नसतंच. रात्रीच्यावेळी आकाशातले तारे हेच मार्गदर्शक ठरतात. आता आपल्याला *गुगल अर्थ, जी. पी. एस्. सिस्टिम* याची उपलब्धता आहे. पण आम्हाला या यंत्रणा उपलब्ध नव्हत्या. कंपास आणि नकाशे जवळ असायचे पण सभोवतालचे भू-आकार, सूर्य, चंद्र, तारे हे सर्व समजून घेऊन त्याचा वापर करणे आवश्यकच होते. माझे जवान वाळवंटात मार्ग शोधण्यासाठी त्यांच्या परंपरागत ज्ञानाचा, आडाख्यांचा वापर करायचे. अनेक वर्षे याच नैसर्गिक परिवेषात उंटावरून प्रवास केल्यानं दिशासंबंधी त्यांचे ज्ञान वाखाणण्यासारखे असायचे. आधी उल्लेख केलेल्या सरकत्या वाळूच्या टेकड्या काहीवेळेस दिशादर्शक म्हणूनही उपयोगी पडतात.

युद्धजन्य परिस्थितीत मनातली भीती आणि एखाद्या प्रसंगी एकदम घाबरून जाण्याची भावना हे लढवय्याचे खरे शत्रू असतात. या दोन शत्रूंवर नियंत्रण न ठेवल्यास बुद्धीचा वापर करून सारासार विचार करण्याची सैनिकांची निर्णयक्षमता नाहीशी होते. अशावेळी भावभावनांना, कल्पनाश तीला दूर ठेवावे लागते; अन्यथा नकारात्मक विचारांचा पगडा बसतो. हे टाळण्यासाठी, मनोबल उंचावण्यासाठी आणि सैनिकांचा आत्मविश्वास वाढावा यासाठी सैनिकांना वेगळे प्रशिक्षण दिले जाते. जेव्हा आमचे युनिट उत्तरेच्या पर्वतीय क्षेत्रातून एकदम वाळवंटी प्रदेशात नियु त केले गेले, तेव्हा वरील सर्व समस्यांचा सामना करता यावा या हेतूने आम्हाला अतिशय खडतर असे प्रशिक्षण दिले गेले.

मी स्वत: आणि माझे सर्व *ऑफिसर्स* दिवसरात्र कठोर परिश्रम करून वाळवंटी जीवनाला सामोरे जाण्याचा यत्न करत होतो. कारण आपण सामान्यत: सुखसोयींच्या चटकन अधीन होतो. आपल्याला कोणतीही गैरसोय किंवा असुविधा झालेली चालत नाही.

युद्धक्षेत्रातील प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून माझ्या सर्व युनिटने एका रात्री ४० कि.मी. अंतर वाळवंटातून पायी पार केले. आकाशातले तारे हीच आमची तेव्हा *'नेव्हिगेशन सिस्टिम'* होती. उजाडण्यापूर्वीच आम्ही शत्रूरेषेच्या जवळील आमच्या जागा न की करून बसलो होतो. आम्हाला तिथेच, त्या अवस्थेत, स्वयंपूर्ण पद्धतीने चार दिवस थांबणं अपेक्षित होतं. त्यासाठी आमच्यापैकी प्रत्येकजण पाठीवर २५ ते ३० किलो सामान घेऊन होते. त्यात काही शस्त्रे, दारुगोळा, खाद्यपदार्थ आणि पाणी



सोडिले सर्व घरदार, त्यागिला मधुर संसार। ज्योतीसम जीवन जगले, ते अमर हुतात्मे झाले।।

जरूर वाचा : भारतीय स्वातंत्र्याचा लढा - ले. डॉ. अनिल गोडबोले, स्वातंत्र्यलढ्यातील काळाचा इतिहास, उन्मेष प्रकाशन

प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टे सास, अमेरिका

होतं. हे चार दिवस गस्त घालत व्यतित करायचे होते. आम्हा जवानांना असलेली खडतर श्रम करण्याची सवय आणि अंगी बाणवलेला कणखरपणा यामुळेच ते श य झालं. जवानांचा निर्धार, रात्रीच्यावेळी वाळवंटातील कारवाया करतानाची अ कलहुशारी आणि धूर्तपणा, अडचणींवर सहजपणे मात करण्याचा स्वभाव आणि या सगळ्या परिस्थितीतही चेहऱ्यावर अखंड असणारं स्मितहास्य हे आश्चर्य वाटण्यासारखंच होतं. आमच्या या प्रशिक्षणात कोणीही मागे राहिला नाही, प्रशिक्षण सोडून निघून गेला नाही किंवा शारीरिक श्रमांनी आजारी पडला नाही. आमचा वाळवंटातील रात्रीचा वावर इतका सहजतेनं असायचा, की जसंकाही आम्ही दिवसाचेच सर्व व्यवहार करत आहोत. शत्रूला सळो की पळो करून सोडण्याचा आत्मविश्वास आमच्यात आला होता. आमच्या सैनिकी प्रशिक्षणामध्ये आम्हाला मिळणारे अनुभव आणि झिरपलेले ज्ञान याच्यामुळे आमची जीवन जगण्याची इच्छा सतत प्रबळ होत जाते. वेळप्रसंगी कठोरपणा, समस्यांचे निराकरण करणे, मार्गातील अडथळे दूर करणे यामुळे आमची शारीरिक आणि मानसिक ताकद व सहनश ती वाढते आणि आम्ही शत्रूशी सामना करण्यास सदैव तैय्यार राहतो.

१९७१ च्या भारत पाकिस्तान युद्धात या एका रेजिमेंटने ३०० किमीचा प्रदेश काबीज केला. त्याबद्दल रेजिमेंटला वीरचक्र प्रदान केले गेले. इ. स. १९७४ मध्ये यातून उंटांचे पथक कमी करून सीमा सुरक्षा दलात ते पथक सामील केले गेले. त्यानंतर पंजाबमध्ये विशेष कामगिरी करून सियाचीन क्षेत्रात 'ऑपरेशन मेघदूत' अंतर्गत 'फर्स्ट ग्रेनेडियर्स बटालियन' म्हणून ही रेजिमेंट सामील झाली. त्यानंतर १९९९ मध्ये आसाममध्ये 'ऑपरेशन ऱ्हिनो' अंतर्गत पराक्रम करून किर्तीचक्र व शौर्यचक्राची मानकरी ठरली. त्यानंतर धाना, श्री गंगासागर, हसिमारा येथे ही बटालियन होती. आजपर्यंत या बटालियनने २ किर्ती, ३ वीरचक्र, ३ शौर्यचक्र, ९ सेना मेडल, २ विशिष्ठ सेना मेडल आणि या व्यतिरि त इतर अनेक पदके, सन्मान मिळवले आहेत. मिझोराम, पंजाब, सियचीन, धाना, गंगासागर, हसिमारा या सर्व ठिकाणी विशेष कामगिरी



सियाचिन क्षेत्रातील 'आपरेशन मेघदूत'

करून ही रेजिमेंट इ. स. २०१४ ला लखनौ येथे आली. नुकताच लखनौ येथे या रेजिमेंटला ५५० वर्षे पूर्ण झाल्याचा दिमाखदार सोहळा झाला.

हे सर्व लिहीत असताना मला नागालँडमधील कोहिमा येथे उभारलेल्या शहीदांच्या स्मारकावरील काही ओळी प्रकर्षाने आठवतात. या युद्धात वीरश्रीने झुंज देऊन धारतीर्थी पडलेल्या जवानांचे हे स्मरण आहे. त्यावरील खालील पं ती आपल्याला संदेश देतात.

When you go back home,
Tell them of Us and say.
For their 'tomorrow' we gave our 'Today'

हे वाचल्यावर श्री. बाबा आमटे यांनी त्याचा केलेला सार्थ अनुवाद आठवतो आणि हे विचार मनाला भिडतात. शहीद सैनिक म्हणतात,

''घरी आपुल्या जाल जेधवा,
सांगा अमुची अंतिम वाणी
'उद्या' तयांचा उज्ज्वल व्हावा,
यास्तव दिधला 'आज' आमुचा''

***

**लेखक : निवृत्त कर्नल अविनाश केळकर**
'अंतरराळ', मॉडेल कॉलनी, पुणे
**– अनु. नीलिमा करमरकर**



या धर्माचे दूत होऊनी, फिरा मग विश्वात। सेवा-समता-संघटनेची, द्वाही फिरवा जगतात।।

जरूर वाचा : नेल्सन मंडेला - ले. बेंजामिन पोग्रुंड, रूपांतर अनंत भावे, द. आफ्रिकेतील नेत्याची कथा, ओरिएंट लाँगमन प्रकाशन

प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड

# सुंदर फसवी जंमत




टी. व्ही. वरल्या जाहिरातींची
एक आगळी असते गंमत
रंगीत-संगीत मुले माणसे
सुंदर सुंदर फसवी जंमत

जाहिरातीतिल हसरी आई
हुशार आणिक प्रेमळ असते
किती घराची तिला काळजी
सारे काही तिलाच कळते!

साबण, शँपू, फ्रीज, मसाले
गाड्या, जोडे आणि बिस्किटे
रंग, धुके अन थेंब-बुडबुडे
खऱ्यासारखे काही खोटे...

जाहिरातींचा असे जमाना
वस्तू विकण्याची ती शर्यत
मजेमजेची पोपटपंची
काही सेकंदांची कसरत

जिवंत अभिनय, कला देखणी
भूल पडावी असेच चित्रण
कल्पकतेची तंत्र-मांडणी
शहाणपणाचे वेडे रंजन...!

दृष्य त्यातले लोभसवाणे
शब्द त्यातले मनात ठसती
'हवे हवे'च्या हवेत सगळे
'नको नको' तर विरून जाती

घटकाभरच्या आभासांचा
जरी कितीही गाजावाजा,
भान शहाणे मनात माझ्या
मी तर जागा ग्राहकराजा...!!

**– आश्लेषा महाजन**
'मंजिरी', २३० चित्ररेखा सोसा.,
सहकारनगर क्र. १,पुणे ४११००९



**मतभेदांच्या पाडुन भिंती, प्रेमाचे घर उभे करूया । स्नेहसुमांच्या गुंफुन माळा, हृदयाची दारे सजवूया।।**

**जरूर वाचा : व्हाय नॉट आय - ले. वृंदा भार्गवे,** सकारात्मक भूमिका असणाऱ्या माय-लेकींचा प्रेरणादायी प्रवास, अमेय प्रकाशन

**प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे**

# भुताचा वाडा

**– मीनाक्षी केतकर**

आनंद पुण्याच्या शाळेत शिकणारा हुशार मुलगा होता. याचवर्षी तो दहावीत गेला होता. त्याची आत्या त्याला खूप दिवस तिच्याकडे बोलवत होती; पण आतापर्यंत तिच्याकडे जाणं आनंदला जमलं नव्हतं. मात्र, या सुट्टीत तरी आत्याकडे जायचं आणि एकटंच जायचं आनंदनं ठरवलंच होतं. आता मोठा झाला होता ना तो! शिवाय एस. टी. नं ५–६ तासांचा तर रस्ता होता. त्याला एकटा जाऊ द्यायला आई तयार नव्हती; पण आनंदच्या वडिलांनी तिची समजूत घातली.

आत्या राहात होती ते एक लहानसं गाव होतं; पण वीज पोचली होती. आनंद बसमधून उतरला. त्याला उतरवून घ्यायला त्याचा आतेभाऊ हेमंत आणि त्याचे बाबा आले होते. जाता जाता त्याला जे गाव दिसलं त्यावरून आनंदचं पहिलं मत तरी फारसं बरं नव्हतं. कारण उघडी गटारं, डुकरं, रस्त्यात उभ्या असलेल्या गाई–म्हशी, त्यांचे गोठे जागोजाग दिसत होते. आत्याचं घर मात्र छान होतं. लहानसं दुमजली घर. पुढे सोपा, अंगण, मागे पडवी आणि सोप्याच्या मागं खोल्या. एकूण जागा छानच होती. अंगणात एका बाजूला आत्यानं छोटीशी बाग केली होती. दुसऱ्या बाजूला आंबा, पेरू, शेवगा यांची झाडं होती. घर बघून आनंद खूष झाला. संध्याकाळी हेमंत त्याला नदीवर घेऊन गेला. नदीच्या एका बाजूला डोंगर, नदीकाठी देऊळ आणि नदीच्या पलीकडे छोट्या पुलावरून गेलं की दाट झाडी. हे सगळं बघून आनंदची कळी खुलली. तो हेमंतला म्हणाला, ''आपण रोज यायचं नदीकाठी. मला इथला परिसर खूप आवडला.''

मग आनंद नेहमी येऊ लागला. हेमंत आनंदबरोबर रोज नाही येऊ शकायचा; पण आनंदला मात्र एकटं जायलाही आवडायचं. लहान पुलावरून पलीकडे गेल्यावर डाव्या बाजूला वळण घेऊन एक रस्ता मोठ्या हमरस्त्याला मिळत होता; पण आनंदला उजव्या बाजूचा रस्ता खुणावत होता. रस्ता कसला; पायवाटच होती ती. ती वाट दाट झाडीत लुप्त होत होती. एकदा आनंद म्हणाला, ''हेमंत एकदा त्या पायवाटेनं जाऊया रे! आम्हाला पुण्याला बघायलाही मिळत नाही अशी दाट झाडी. किती छान गच्च रान आहे ते.''

आत्यानं लगेच दटावलं, ''मुळीच जायचं नाही तिकडे. तिथं साप, विंचू आहेतच. शिवाय कुणीही जात नाही तिकडे. अगदी एकाकी भाग आहे तो.''

''पण का आत्या? साप





वंदन भारतमातेला करू। या मातेची मुले लाडकी, सदा तिचा ध्वज उंच धरू।।

जरूर वाचा : खरेखुरे आयडॉल्स - संपा. सुहास कुलकर्णी, समाजकार्य करणाऱ्या व्य तींच्या कार्याचा परिचय, समकालीन प्रकाशन

प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली

विंचवाला काय भ्यायचं?''
''उगीच वाद घालण्यात तुम्ही मुलं हुशार असता. 'का', 'कशाला' असे प्रश्न विचारायचे... मोठ्यांचं ऐकायचं नाही... तुला काही झालं तर दादाला तोंड कशी दाखवू मी?''

आत्या रागावलेली पाहून आनंद गप्प बसला. हेमंतचे बाबा म्हणाले, ''रागावू नकोस त्याच्यावर. शहरातल्या मुलांना कुतूहल असतं. चौकस असतात ती. मी सांगतो खरं काय ते. दाट झाडीतून आत गेल्यावर एक खूप जुना, पडझड झालेला वाडा आहे. तो भुतांनी पछाडलेला आहे, असा प्रवाद आहे. तिथून रात्री किंकाळ्या ऐकू येतात. वटवाघळं भिरभिरतात.''

''पण काका, भुतं नसतातच! माझे बाबाच म्हणत होते. आणि वटवाघळं काय पड  या घरात असतातच.''

''अरे, पण मुद्दाम विषाची परीक्षा कशाला घ्यायची? 'भुतं असतात' असं म्हणतात ना, असूदे बापडी. आपण तिकडे जाऊही नये आणि त्याविषयी बोलूही नये, हेच बरं नाही का? आणि तुला माहीत आहे का आनंद, गेल्या एक दोन महिन्यात गावातून तीन मुलं नाहीशी झाली आहेत. ती परत काही गावात दिसली नाहीत. गावच्या फौजदारांनी खूप तपास केला; पण ती मुलं जशी हवेत विरून गेली. शिवाय चुकून काही मेंढरं त्या झाडीत शिरली; ती मेंढरं पण गावात परत आली नाहीत. तेव्हा आनंद, प  कं लक्षात ठेवायचं. तिकडे फिरकायचं नाही.''

आनंदनं मुकाट्यानं ऐकून घेतलं खरं; पण त्याला चैन पडेना. खरं तर 'भुतं नाहीत' हे त्याच्या बाबांनी सांगितलं होतं. त्याचे बाबा 'अनिसं' म्हणजे **अं**धश्रद्धा **नि**वारण **सं**घटना या संस्थेचे एक क्रियाशील कार्यकर्ते होते. त्यामुळे आनंद लहान होता तेव्हापासून त्याच्यावर हे संस्कार झाले होते. त्यामुळे भुताची हकीकत त्याला खरी वाटणं श  यच नव्हतं. त्याला त्या वाड्यात भुताचा शोध घ्यावासा वाटू लागला. बरोबर कुणाला घ्यावं बरं? हेमंतला तर श  यच नाही; पण गावातल्याच एका बेडर, दांडग्या मुलाशी– शिवाशी त्याची ओळख झाली होती. वयानं तो १७-१८ वर्षांचा होता. त्याला कशाची भीती अशी नव्हतीच. अगदी एकटा होता शिवा. देवळात झोपायचा. कुणाची ओझी उचल, गायी-म्हशी चरायला ने, तालु  याच्या गावी जाऊन कुणाच्या गरजेच्या वस्तू– औषधे आणून दे, कुणाची लाकडे फोडून दे अशी कामं करायचा शिवा. तेही मोबदल्याची अपेक्षा न करता. त्यामुळे कुणी ना कुणी त्याला जेवायला द्यायचं. शिवाच्या मनमिळाऊ वागण्यामुळे आनंदला शिवाविषयी आपलेपणा वाटू लागला. आनंदानं शिवाला हाताशी धरायचं ठरवलं. त्या भुताच्या वाड्याचं कुतूहल आनंदला गप्प बसू देईना.

''शिवा, त्या भुताच्या वाड्याशी येशील? तिथं आपण कुणाच्याही नकळत जायचं''

''कशाला रं? तू शेरातनं आल्याला हाईस. तुला काय झालं तर तुझा काका मला फोडून काडील. नगं बा.''

''घाबरतोस का शिवा भुताला?''

''छा:! मला भूत काय करणार हाये? मला न्हाई कशाचं बी भ्या वाटत; पन तुला जाऊसं वाटत असंल तर म्या घेऊन जाईल तुला. लोकं घाबरत्यात भुताला; तुला न्हाई भुताची भीती वाटत?''

''छट् मुळीच नाही. कारण भुतं नसतातच. तू न  की येशील? मग आजच रात्री अंधार पडल्यावर जायचं. ठरलं तर मग!''

त्याचदिवशी आनंद आणि शिवाची जोडगोळी नदीच्या लहान पुलावरून त्या पायवाटेला लागली. दूरवर तो वाडा दिसत होता. मिणमिण उजेड वाड्याच्या खिड  यातून दिसत होता. वाड्याच्या जवळचं एक झाड त्यांनी निवडलं. झाडाची एक फांदी वाड्याच्या खिडकीजवळ पोचत होती. शिवा आणि आनंद त्या फांदीवर टोकाशी गेले. आनंदनं आपली दुर्बीण डोळ्याला लावली. त्या मिणमिण उजेडात उंच विचित्र सावल्या हलताना त्याला दिसत होत्या. आनंद फांदीला चिपकून बघत होता. मग त्याला काही



हे राष्ट्र विक्रमाचे, हे राष्ट्र शांततेचे । सत्यार्थ झुंज द्यावी, या जागत्या प्रथेचे।।

जरूर वाचा : नापास मुलांची गोष्ट - संपा. अरूण शेवते, अनुभवपर प्रेरणादायी पुस्तक, ऋतुरंग प्रकाशन

प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५



माणसांचं बोलणं ऐकू आलं. त्यानं कान देऊन ऐकलं.

*''सुनो, तीन पार्सल भेज रहा हूँ। परसो अमोश्या है। उसी दिन समझा ना।''*

आनंद चकितच झाला, 'भुतं बोलतात? आणि तेही मोबाईलवरून आणि हिंदीतून? *मॉडर्न* भुतं दिसताहेत.'

शिवानंही हे बोलणं ऐकलं होतं. तो आनंदला म्हणाला, ''चल, जायचं का आत? भुतं न्हाईत, गुंड हायेत त्ये.''

पण आनंदनं त्याला आवरलं. ''आत्ता नको, परवा येऊया आणि तयारीनं येऊया; पण याबाबत तू कुणाजवळ काहीही बोलू नकोस.''

मग आनंदनं त्याच्या वडिलांना *'पब्लिक बूथ'* वरून फोन लावला. सगळी हकीकत सांगितली.

''बाबा तुम्ही याल का इथे? इथे काहीतरी भयंकर कारस्थान चालू आहे. मी कोणालाही काही सांगत नाही; पण तुम्ही इकडे या,'' आनंद म्हणाला.

''मी येतो आनंद; पण तोपर्यंत तू वेडं धाडस करायचं नाहीस. पुन्हा तिकडे जाऊ नकोस. मी परवा न की येतो,'' बाबा म्हणाले.

आनंद बाबांची वाट पाहात होता. त्याप्रमाणे बाबा आले. अवचित भाऊ आल्यामुळे आत्यालाही आश्चर्य वाटलं. येताना आनंदच्या बाबांनी थेट पोलिसांशी संपर्क साधला. बाबांनी पोलिसांना माहिती दिली.

ठरल्याप्रमाणे, त्या रात्री दाट झाडीमध्ये वाड्याभोवतीच्या रानात सगळे पोलीस साध्या वेषात लपून बसले होते. काही झाडावर लपून बसले. रात्रीच्या त्या अंधारात वाड्यात व बाहेर काही हालचाली चालू आहेत असे जाणवत होते. वाड्यासमोर एक व्हॅन येऊन उभी राहिली. वाड्यातल्या मिणमिणत्या प्रकाशात वाड्यातून दोनतीन माणसं खांद्यावर ओझं टाकून बाहेर आली. अशी 'तीन ओझी व्हॅनमध्ये टाकल्यावर व्हॅन सुरू होणार,' असं त्यांच्या बोलण्यातून पोलिसांच्या लक्षात आलं. त्यामुळे पोलिसांनी व्हॅनभोवती आणि वाड्याभोवती गराडा घातला. ड्रायव्हर आणि व्हॅनमधील चौघांना बाहेर खेचून



**इंद्रधनूचे रंग वेगळे, तरिही त्यांची एक कमान। विभिन्नतेतहि देश गातसे, एकत्वाचे गीत महान।।**

**जरूर वाचा : तळेगावचे शिलेदार, ले. विनया केसकर**, चतुरस्त्र व्य तीचा परिचय, अक्षता प्रकाशन

**प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे**



काढलं. त्यांची पोलिसांची चकमक उडाली. अखेर पोलिसांनी त्यांना बेड्या घातल्या. व्हॅनमधली ती ओझी बाहेर काढली. तोंडात बोळे कोंबलेली लहान मुलं त्यात होती. त्यांना मोकळे केले. वाड्यात पोलिसांनी शोध घेतला. तिथे कोणी नव्हते; पण ८-१० फुटांचे चमत्कारिक आकाराचे *हार्डबोर्डचे कटआउटस्* होते. त्यांच्या विचित्र सावल्या म्हणजेच भुते आहेत असं ती माणसं लोकांना भासवत होती.

ती लहान मुलं रडत होती. त्या गुंडांच्या म्होर याला पोलिसांनी ताब्यात घेतलं. दमात घेतल्यावर म्होर यानं सगळं कबूल केलं. अशा लहान मुलांना पळवून म्होर या मुंबईला ठरलेल्या गुंडाकडे पाठवायचा. तिथं त्यांना चोऱ्या करायला किंवा ते जमलं नाही तर भीक मागायला बसवायचा. मुलांना चोऱ्या व पॉकेटमारी करायला पद्धतशीर शिकवलं जायचं. पोलिसांकडून ती टोळी आज जेरबंद करण्यात आली. मग मुलांच्या पालकांचा शोध घेतला. त्यांचे आई-वडील सापडले. पालकांना तर आनंदानं रडू आवरत नव्हतं.

हा भुताचा किस्सा वर्तमानपत्रातून उघडकीस आला. त्यात आनंदच्या चौकस बुद्धीचं आणि वाड्याजवळ जाण्याच्या धाडसाचं तसंच शिवाचंही खूप कौतुक झालं. गावाकडून व पोलिसांकडूनही आनंदचा आणि शिवाचा गौरव करण्यात आला. शिवाची साथ नसती तर आनंद एकटा हे धाडस करू शकला नसता. आत्याला आणि काकांना तर आनंदला कुठे ठेवू नि कुठे नको असं झालं.

आता तो वाडा, ते रान सगळं लोकांच्या जाण्यायेण्यानं गजबजून गेलं. 'भुतं नाहीत' हे लोकांना आता पटलं होतं. हे केवढं मोठं कार्य आनंदच्या हातून घडलं होतं.

***

**- मीनाक्षी केतकर**
४ क्षितिजरेखा, तिसरी गल्ली,
डहाणुकर कॉलनी, कोथरुड, पुणे 411038

## हसा हसा...

### अशी ही कंजुशी

एक व्यापारी भलताच कंजूष होता. एक दिवस त्याच्या शेजारच्या घरी मेजवानी होती. त्या शेजाऱ्याच्या नोकराने त्या व्यापाऱ्याच्या नोकराला विचारले, ''काय रे, तुझा मालक कधी देणार अशी मेजवानी?''

''पुढील जन्मी'' तो नोकर उत्तरला. नेमके हे बोलणे त्या कंजूष व्यापाऱ्याने ऐकले व नोकराला झापले, ''मूर्खा, मला न विचारता का दिले हे निमंत्रण?''

### धोका (च)

भला मोठा ट्रान्सफॉर्मर लावलेल्या विजेच्या खांबावर विद्युत मंडळाने लावलेला एक फलक...

'धोका! या खांबाला स्पर्श करू नका. स्पर्श करणारा जिवंत राहणे केवळ अश य आहे. यावरही जे स्पर्श करतील त्यांच्यावर कायदेशीर इलाज केला जाईल.'



गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे । आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे ।।


**जरूर वाचा : विश्वविजेते - डॉ. संजय ओक**, निवडक उद्योजकांच्या प्रवासाचा वेध घेणारे प्रेरणादायी, मनोविकास प्रकाशन

**प्रायोजक - श्री. अखिलेश संतोष काकडे, पुणे**

# पानगळ

– डॉ. कांचनगंगा गंधे

**शिशिर ऋतूत मोठ्या वृक्षांची पानगळ होते. अन्न तयार करण्याचं पानांचं कार्य थांबतं; पण खोडात साठवलेल्या अन्नामुळे झाड जिवंत राहतं ! पानगळीमुळे झाडात तयार झालेली घातक आणि टाकाऊ द्रव्यही बाहेर फेकली जातात. झाड पुन्हा जोमानं वाढण्यासाठी तयार होतं ! वसंत ऋतू सुरू झाला, की नवीन कोवळी पालवी यायला लागते. पानाचं कार्य पुन्हा सुरू होतं. विनाश आणि पुनर्निर्माण हे सृष्टीतलं चक्र 'पानगळ' या प्रकारातून दिसून येतं !**




वर्षाऋतू संपून शरद –शिशिराचं आगमन झालंय! साऱ्या सृष्टीत बदल घडताहेत! परिवर्तनाच्या खुणा वनस्पती सृष्टीतही जाणवताहेत! वर्षाऋतुतल्या जमिनीवरच्या हिरव्यागार सौंदर्याचा आता मागमूसही दिसत नाहीये. एवढंच काय; पण सदाहरित वृक्षांचा अपवाद सोडला, तर अनेक मोठ्या वृक्षांची पानं तपकिरी, पिवळी झालेली दिसतील. काहींची पानं एकदम गळून वृक्ष उघडे बोडके, पर्णहीन झालेले दिसतील! हिरव्यागार पानांची ही अशी दशा कशी काय झाली असेल? असा प्रश्नही तुम्हाला पडला असेल! पण हा निसर्गाचा, सृष्टीचाच नियम आहे! परिवर्तन होणारच! ठरावीक ऋतूत ठरावीक बदल घडणारच! म्हणूनच सृष्टीचं चक्र गेली लाखो वर्षं एका ठरावीक क्रमानंच अविरतपणे, अविश्रांतपणे चालू आहे!

शिशिर ऋतूत मोठ्या वृक्षांची होणारी 'पानगळ' ही सृष्टीचक्रातलीच एक घटना! खरं तर ह्या घटनेचा आरंभ पावसाळा संपल्या संपल्याच सुरू झालेला असतो. वर्षभर अन्न तयार करून वृक्षाला वाढवणारी पानं थकून जातात आणि म्हणूनच ती पिवळी, तपकिरी पडतात आणि एक दिवस पानं गळून पडतात. झाडापासून जेव्हा ती वेगळी होतात, तेव्हा खोडात अनेक बदल घडतात. ही बदल होण्याची प्रक्रिया समजून घेतली तर झाडं स्वत:ची किती काळजी घेतात हे दिसून येतं.

हेमंत–शरद ऋतूत पानं प व होऊन पिकायला लागतात. म्हणजेच हिरवी पानं पिवळी पडायला लागतात. पानांमधलं हरित द्रव्य नाहीसं व्हायला लागतं. प्रत्येक पानाच्या देठाच्या तळाशी खोडाच्याजवळ एक 'क्षेत्र' किंवा 'रिंगण' तयार होऊ लागतं. विशिष्ट प्रकारचा रस खोडाच्या आत तयार केला जातो. ह्या रसामध्ये दोन 'थर' तयार होतात. देठाच्याजवळ म्हणजे 'रिंगण' क्षेत्राजवळच्या थराला 'विभाजक थर' किंवा स्तर *(सेपरेशन लेअर)* आणि सालीजवळच्या आतल्या थराला 'संरक्षक थर' (स्तर) *(प्रोटेक्टिव्ह लेअर)* म्हणतात. पान पूर्ण गळून पडेपर्यंत हे दोन्ही थर एकमेकांना जोडलेले असतात. त्यांच्यात संपर्कही असतो. अन्न, पाणी दोन्ही थरांमधून पानाला पोहोचवलं जातं, म्हणून पान पिवळं पडलं तरी खोडाला चिकटलेलं असतं!

विभाजक थरातल्या पेशी ह्या संरक्षक थर आणि देठाच्या भागातल्या पेशींपेक्षा खूप वेगळ्या असतात. विभाजक थरातल्या पेशी आकारानं लहान आणि त्यांच्यात स्टार्चचं प्रमाण जास्त असल्यामुळे पेशीद्राव घट्ट असतो. अन्न, पाणी वाहून नेणाऱ्या ह्या थरातल्या नलिकांमध्ये गोंदासारखा चिकट पदार्थ तयार व्हायला लागतो. हळूहळू हे प्रमाण वाढते आणि नलिका ह्या



महासागरी उफाळणाऱ्या, लाटांशी झुंजू। अन्यायाच्या, फुटीरतेच्या, जिव्हाही छाटू।।

जरूर वाचा: कुण्या एकाची धरणगाथा – ले. अभिमन्यू सूर्यवंशी, शेतकऱ्याच्या यशस्वी झुंजीची कहाणी, समकालीन प्रकाशन

प्रायोजक – सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे



पदार्थांनी पूर्ण भरून जातात आणि त्या बंद होतात, परिणामी देठातून पानाकडे पाणी वाहण्याचे बंद होते. परंतु पानांमध्ये प्रकाश संश्लेषणाच्या क्रियेमध्ये तयार झालेलं अन्न (प्रामुख्याने ग्लुकोज) आणि झाडांमधले टाकाऊ द्रव्य साठलं जातं. नलिका बंद झाल्यामुळे पानांना पाणी मिळत नाही. त्यामुळे पानांचं कार्य हळूहळू थांबतं, परिणामी पानातलं हरितद्रव्य कमी व्हायला लागतं आणि पानातली इतर रंगीत द्रव्य *(कॅरेटिनॉईड्स)* दिसायला लागतात. म्हणजेच पानं तपकिरी, पिवळी दिसतात. 'समशितोष्ण' कटिबंधातल्या म्हणजे आपल्याकडच्या भागात वृक्षांवरची पानं पिवळी दिसतात तर अति थंडी असलेल्या (उदा. अमेरिका) भागात पानं लाल, भगवी, नारिंगी, पिवळी दिसतात. त्यामुळेच त्या भागात 'पानगळ' अतिशय सुरेख दिसते.

संरक्षक थरातल्या आणि खोडातल्या पेशींच्या भिंती तीन थरांच्या असतात. त्यापैकी बाहेरच्या आणि मधल्या थरातल्या भिंती विभाजक थरातल्या चिकट द्रावामुळे खूप फुगतात कारण विभाजक थर आणि संरक्षक थर एकमेकांना चिकटलेलेच असतात. जेव्हा नलिकांमध्ये चिकट द्राव प्रमाणाबाहेर तयार व्हायला लागतो. तेव्हा त्याचा दाब ह्या पेशींच्या भिंतीवर पडतो. परिणामी, त्या भिंती तुटतात. मधल्या भिंतीत 'कॅलशियम पे टेट' असते. त्यांचे रूपांतर 'पे टीक ॲसिड' आणि नंतर 'पे टीन'मध्ये होते. ते वनस्पतींमधल्या आणि पेशीद्रावातल्या पाण्यात विरघळतात. त्यामुळे जवळजवळ असलेल्या पेशी वेगवेगळ्या किंवा अलग होतात; पण नलिकांमुळे त्या जोडलेल्या राहतात. परिणामी पान झाडाला चिकटलेलंच राहातं. पण काही दिवसांनी या नलिकाही दुर्बल होतात. त्यांचं कार्यही हळूहळू कमी होऊन बंद होतं! नलिकांच्या पेशी चपट्या, निकामी होता. विभाजक स्तराला आता अन्न, पाणी काहीच मिळेनासं होतं. पिकल्या पानात साठून राहिलेल्या ग्लुकोज आणि टाकाऊ पदार्थांचा भार विभाजक थराला आता सहन होत नाही. वाऱ्याच्या मंद झुळकेनंही पान देठासकट गळून पडतं... 'पानगळ' सुरू होते.

पानगळ सुरू झाल्यावर देठासकट पान गळून पडल्यामुळे देठ चिकटलेला खोडाचा भाग उघडा पडतो. तेथून झाड वाळण्याची प्रक्रिया सुरू होण्याची श यता असते. त्यातून जीवाणू, कीटक आत जाऊन झाडाला इजा होण्याची श यता असते. दरवर्षीच 'पानगळ' होत असते. ह्या दिवसांत त्यामुळे झाडाला इजा होऊन झाड नष्ट होण्याची श यता असते; पण निसर्गानेच विशेषत: झाडानंच यावर उपाय शोधलेला असतो. म्हणूनच जेव्हा विभाजक थर तयार होत असतो; तेव्हाच खोडात संरक्षक थरही तयार झालेला असतो. या संरक्षक थरातल्या पेशींच्या भिंतीवर पानगळीची प्रक्रिया सुरू झाल्यावर 'सुबेरिन' हा करड्या रंगाचा जाड पदार्थ तयार होऊ लागतो. सुबेरिनमधून हवा, पाणी आत जाऊ शकत नाही. त्यामुळे पानगळ झाली तरी सुबेरिनच्या आवरणामुळे खोडाच्या आतल्या भागाचं संरक्षणच होतं. सुबेरिन म्हणजे पानगळ झालेल्या जखमेवरची 'खपली'च म्हणावी लागेल. म्हणूनच पान गळून पडल्यावर त्याची खूण व्रणरूपाने झाडावर राहते.

***

पुढे पानाच्या संदर्भात निरीक्षणाने करता येण्यासारख्या प्रकल्पांचे विषय तपशीलात दिले आहेत. त्यातील प्रकल्प जरूर करून पाहा आणि छात्र प्रबोधनकडे पाठवायला विसरू नका.



**प्राणप्रिय हे राष्ट्र आमुचे, राष्ट्रप्रेम रुधिरात। राष्ट्राच्या ऐ यात आमुचे, लक्ष लक्ष हे हात ।।**

**जरूर वाचा : जंगलाचं देणं - ले. मारुती चितमपल्ली,** अरण्यातील वास्तव्याची उत्कंठा वाढवणारे लेख, साहित्य प्रसारकेंद्र नागपूर


**प्रायोजक - श्री. राहुल भिडे, पुणे**

# पान प्रकल्प

दोस्तांनो, कोणत्याही शाखेचा प्रकल्प सुरू करण्याआधी काही प्राथमिक गोष्टींचा विचार आपल्याला करावा लागतो. सर्वप्रथम विषय निवडा. त्यातला कोणता प्रकल्प आपण करू शकतो, त्यासाठी लागणारी आयुधं, साहित्य, रसायनं, त्याचा विचार करूनच कोणता प्रकल्प करायचा हे निश्चित करा.

या लेखाद्वारे 'निसर्ग' विषयातला 'पान प्रकल्प' किती प्रकाराने करता येईल याबाबत उदाहरणे देऊन काही मुद्दे सांगितले आहे. अर्थात तुम्ही त्यात न कीच भर टाकाल. प्रकल्पातला प्रत्येक प्रकार तुम्हाला काही ना काहीतरी शिकवेलच; पण त्यासाठी निसर्गातल्या बारीक बदलांची नोंद तुम्हाला करता आली पाहिजे. त्यासाठी निसर्गाची आवड, निसर्ग वाचन 'डोळस' वृत्तीनं करायला हवं. कोणताही प्रकल्प लिहिताना, सादर करताना पुढील मुद्द्यांची पूर्तता करा. म्हणजे तुमचा प्रकल्प बऱ्याच अंशी परिपूर्ण होईल. उदाहरणार्थ पानांविषयी प्रकल्प सादर करताना खालील मुद्द्यांचा विचार करा.

१. शीर्षक - 'पान प्रकल्प' २. कालावधी - एक, दोन किंवा तीन ऋतू - त्या अनुषंगाने किती दिवस ३. खर्च ४. साहित्य-प्रयोगशाळेतलं, निसर्गातलं उदा. प्रयोगशाळेतली रसायनं; कोणत्या झाडांची पानं वगैरे, नोंदवही, पट्टी, पेन्सील, रंगीत पेन्सील्स इ. ५. निरीक्षणांची वारंवारिता - निरीक्षणं दररोज की ठरावीक दिवसांनी केलीत ६. निरीक्षणांच्या बारीक सारीक तपशीलांसह नोंदी ७. उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणत्या कार्यपद्धती वापरल्या, त्यासाठी कोणते संदर्भ पाहिलेत इत्यादी. ८. निष्कर्ष/ अनुमान ९. प्रकल्पातून काय साध्य केलंत? कोणत्या गोष्टी शिकलात, आत्मसात केल्यात? १०. या प्रकल्पाचा उपयोग कोणाला होऊ शकेल?



**'पान प्रकल्प' वेगवेगळ्या कितीप्रकारे करता येऊ शकेल –**

- थंडीचे दिवस सुरू झाले, की बऱ्याच मोठ्या वृक्षांची 'पानगळ' होते. पानं हिरवी असतानाच गळतात की त्यांच्या रंगात बदल झाल्यानंतर गळतात, याची तुम्ही नोंद करा. पानगळ होत असताना पानाचा रंग बदलायला लागल्यानंतर किती दिवसांनी पान गळलं ते लिहून ठेवा. रंग बदलताना पानातल्या शिरा केव्हा स्पष्ट दिसायला लागल्या त्याचीही नोंद ठेवा.
- प्रत्येक झाडाच्या पानांमधल्या शिरांची ठेवण, मांडणी वेगवेगळी असते. त्याचा अभ्यास करा.

पिंपळाचं जाळीचं पान तुम्ही न कीच पहिलं असेल. त्याप्रमाणेच पानांमधलं शिरांचं जाळं पाहाण्यासाठी एक छोटा प्रयोग करा. वेगवेगळ्या झाडांची पानं आणा. त्याचं चित्र काढून ठेवा. पान वहीवर ठेवूनही त्याचा आकार तुम्ही पेन्सीलने काढू शकाल. प्रत्येक पानाला क्रमांक द्या. तुमच्या माहितीसाठी त्यातले एक पान वहीत किंवा वर्तमानपत्रात ठेवून त्यावर सर्व बाजूने सारखा दाब द्या. दर दोन दिवसांनी वर्तमानपत्र बदला म्हणजे पानाला बुरशी येणार नाही. प्रयोग झाल्यानंतर हे वाळलेलं पान आणि शिरांचं जाळं झालेलं पान शेजारी-शेजारी चिकटवा म्हणजे जाळीचं निरीक्षण नोंदवता येईल. पानातील शिरा



अम्हि देशाचे सुपुत्र कन्या, हिंदूभूमिचे नाव गाजवू। सत्यशांतिचा, मित्रत्वाचा, जगतात संदेश पोचवू।।

जरूर वाचा : साप - ले. किरण पुरंदरे, ४६ प्रकारच्या विविध सापांची ओळख करून घेण्यासाठी, ज्योत्स्ना प्रकाशन

प्रायोजक - प्रतिभा इले ट्रिकल्स, पुणे



स्पष्ट दिसण्यासाठी एक प्रयोग करा. पान पाण्यात उकळवा. पान फारच पातळ असेल तर पाणी उकळून मग त्यात पान टाका. पाणी गार झालं, की पान पाण्यातून बाहेर काढून कागदावर, कपड्यावर ठेवून ब्रशनं साफ करा. ही कृती तुम्हाला दोन तीनदा करावी लागेल. नंतर थोड्या पाण्यात ब्लिचिंग पावडर टाकून त्यात पान टाका. थोड्या वेळानं ते पान साध्या पाण्यात टाका. शिरांचं जाळं दिसेपर्यंत ही कृती करा.

प्रत्येक पानांच्या शिरांची निरीक्षणे नोंदवा. कोणती पाने सारख्या शिरांची, कोणती वेगळी, त्यात कोणते प्रकार आहेत ते बघा. 'पाने ताठ का राहात असतील' याचाही विचार करा. वृक्षांवरची पानं गळून गेल्यानंतर वृक्षाचा आकार, फांद्यांची रचना यांची नोंद करा. तुम्ही पानांचे आकार वहीत काढलेले आहेतच. ती पानं कोणत्या झाडाची आहेत त्याचं नाव एखाद्या तज्ज्ञाला विचारून ते लिहून ठेवा. त्याशिवाय पानाच्या कडा, पानाचं टोक, पान साधं की संयु त, संयु त असेल तर किती पर्णिका इत्यादींचं निरीक्षण करून वहीत नोंदवा.

• चैत्रात झाडावर पालवी यायला लागेल. ज्या झाडाचं निरीक्षण तुम्ही थंडीत नोंदवलं होतंत (ज्यांची पानगळ झाली होती) त्याच झाडांना पालवी कधी, कशी येते ते नोंदवा. पानगळ झाल्यानंतर किती दिवसांनी पालवी फुटली त्याची नोंद करा. पालवी येण्याची प्रत्येक झाडाची तऱ्हा सारखीच आहे की वेगवेगळी ते पाहा. पालवीचा रंग पोपटी आहे की अन्य कोणता आहे, त्याची नोंद ठेवा. उदा. पिंपळासारख्या काही वृक्षांची पालवी वेगळ्या रंगाची असते. पालवीचं निरीक्षण सूर्योदय आणि सूर्यास्ताच्या वेळेला करा. शिवाय कोवळ्या पालवीवर पक्षी, किडे येतात का तेही नोंद करा. नेचे म्हणजे फर्न. नेच्याची नवीन पानं येताना खूप वैशिष्ट्यपूर्ण येतात. ती बघा. प्रत्येक प्रकारात वेगळेपण जाणवेल. पोपटी पालवी हिरवीगार व्हायला, पालवीचे पूर्ण पानं व्हायला, किती दिवस लागले ते निरीक्षण वहीत नोंदवा. पूर्ण पान तयार झाल्यावर त्याच्या आकारातलं वैविध्य जाणून घ्या. काही वनस्पतींची पानं रंगीतही असतात, झाड सावलीत आणि उन्हात ठेवल्यावर पानाचा रंग बदलतो का? बदलल्यास का बदलत असेल? पानात कोणत्या प्रकारची रंगीत द्रव्य आहेत. तुम्हाला प्रयोग करून बघता येईल. त्यासाठी 'पेपर क्रोमॅटोग्राफी' करावी लागेल. या प्रयोगाची कार्यपद्धती तुम्हाला त्या विषयातल्या तज्ज्ञाकडून समजून घ्यावी लागेल.

• उन्हाळा संपल्यानंतर पावसाळा सुरू होईल. थोड्याच दिवसात जमिनीवर पोपटी, हिरव्या रंगाचा गालिचा पसरलेला दिसेल. या गालिच्यामध्ये कितीतरी तऱ्हेची पानं दिसतील. त्यांची नोंद करून मोठ्या झाडांच्या पानांबरोबर त्यांची तुलना करा. सतत पावसात असूनही ती पानं कुजत का नाहीत? यांचा विचार करा. बघा उत्तर सापडतं का !

• पाण्यातल्या वनस्पतींची पानं बघा. पाण्यात राहूनही किंवा त्यावर तरंगूनही पाणी जरासुद्धा त्यांच्या पानांवर नसतं. असं का? ते शोधा. त्यासाठी पानांचा पातळसा छेद घेऊन सूक्ष्मदर्शकाखाली बघावा लागेल. तळ्यामध्ये जी पानं तरंगतात त्यावर कोणते पक्षी, प्राणी सहजी चालत जातात त्यांची नोंद करा. पानांवरून कसे चालत असतील हे प्राणी? त्याचं उत्तर शोधा.

जमिनीवर वाढणाऱ्या काही पानांचाही छेद घेऊन त्यांची पाण्यातल्या पानांशी तुलना करा. काय फरक जाणवतो बघा.

• अळूसारख्या पानांना हात लावला की हाताला लगेच खाज सुटते, तर काहींमुळे हात लगेच सुजतो. असं का होतं ? उत्तर मिळवा.

**कणाकणांना अणुरेणूंना, शपथ येथल्या मातीची। व्य ती व्य ती येथील आता, एकच मानवतेच्या जातीची।।**

**जरूर वाचा : निसर्गोत्सव - ले. दुर्गा भागवत,** निसर्गातील स्थित्यंतरे टिपण्याची दृष्टी मिळवण्यासाठी, दिलीप प्रकाशन


**प्रायोजक - कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे**

• तुळस, गवती चहा, दगडपाला, गुलबक्षी, निरगुडी, कोरफड अशा अनेक वनस्तींच्या पानांचे औषधी उपयोग आहेत. आई-वडील, आजी आजोबांना विचारून त्यांचे औषधी उपयोग विचारून नोंद करून ठेवा. यांशिवाय, हवेतली प्रदुषके शोषून घेण्यासाठी रस्त्याच्या कडेला कोणते वृक्ष लावतात त्यांची नोंद करा. त्यासाठी ठरावीक झाडंच का लावत असतील? कोणतं झाड जास्त प्रदुषके शोषतं? ते प्रयोगानिशी सिद्ध करण्याचा प्रयत्न करा. अशा वनस्पतींची माहिती संदर्भ ग्रंथ, पुस्तकातून शोधून काढा.

• पळस, आपटा यांसारख्या वनस्पतींची पानं द्रोण, पत्रावळी करण्यासाठी वापरतात. अजून कोणत्या पानांच्या पत्रावळी करता येतात, तेही शोधून काढा. तुम्हीही एखादी पत्रावळ, द्रोण तयार करण्याचा प्रयत्न करा.

• कोणत्या वनस्पतींच्या पानांचा उपयोग पक्षी घरटी बांधण्यासाठी करतात, त्याची माहिती गोळा करा. शिंपी, मुनिया यांसारखे छोटेखानी पक्षी घरटं बांधतात, त्यावेळेस बारकाईनं निरीक्षण करा. त्याच्या नोंदी ठेवा.

• आपल्या हिंदू धर्मात अनेक धार्मिक सण, व्रतवैकल्यांचं महत्त्व सांगितलं आहे. त्यात निसर्गातल्या अनेक श तींना मानाचं स्थान दिलंय. त्यात कोणकोणत्या वनस्पतींच्या पानांना महत्त्वाचं स्थान दिलंय आणि ते का दिलं असेल, याचं शास्त्रीय कारण काय असेल ते शोधून काढा. हे पान-प्रकल्प करण्यासाठीचे काही विषय आहेत.



त्याखेरीज, **पानांचा उपयोग कलाकौशल्यांसाठी –** विविध आकाराची, प्रकारची पानं देठापासून तोडून वहीत किंवा वर्तमानपत्रात ठेवा. त्यावर जड वजन ठेवा किंवा कागदावर पान ठेवून त्यावर पातळ कापड पसरून कोमट इस्त्री फिरवा म्हणजे पान लवकर वाळेल आणि रंगही टिकेल. ही पानं वापरून संक्रांतीनिमित्त 'शुभेच्छा पत्र' (ग्रीटींग्ज) बनवा. मित्रमैत्रीणींना द्या. बघा तुमच्या हटके शुभेच्छा पत्रांचं कौतुक होईल.

***

**– डॉ. कांचनगंगा गंधे**
४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे 411030

## किस्से शास्त्रज्ञांचे

- नोबेल पारितोषिक विजेते **डॉ. आल्बर्ट** श्वाइत्झर नेहमी आगगाडीतून तिसऱ्या वर्गाने प्रवास करीत. एवढ्या मोठ्या माणसाने तिसऱ्या वर्गातून प्रवास करावा याचे आश्चर्य वाटून कोणीतरी त्यांना विचारले, ''तुम्ही नेहमी तिसऱ्या वर्गाने प्रवास का करता?''
  डॉ. आल्बर्टनी उत्तर दिले, ''चौथा वर्ग नाही म्हणून!''
- एकदा सुप्रसिद्ध संशोधक **आइन्स्टाइन** बसमधून कचेरीत चालले होते. बसमध्ये चढताना त्यांनी वर्तमानपत्र विकत घेतले; पण चष्मा घरीच विसरला असल्यामुळे त्यांना वर्तमानपत्र वाचता येईना. त्यांनी शेजारच्या माणसाला विनंती केली. ''महाशय, कृपया या वर्तमानपत्रातील ठळक मजकूर वाचून दाखवता का?'' शेजारचा माणूस पटकन म्हणाला, ''माफ करा, मी तुमच्यासारखाच निरक्षर आहे.
- सुप्रसिद्ध संशोधक **एडिसन** यांनी बरेच शोध लावले होते. त्याबद् दल एकदा त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराचे भाषण करताना एक व ता फोनोग्राफचा उल्लेख करून म्हणाला, ''एडिसन यांनी बोलणाऱ्या यंत्राचा शोध लावला आहे, असे आता सांगण्यात आले.''
  नंतर सत्काराला उत्तर देताना एडिसन म्हणाले, ''बोलणाऱ्या यंत्राचा शोध मी लावलेला नाही. ते परमेश्वरानेच निर्माण केलेले आहे. मी शोध लावलाय, तो केव्हाही ज्याचे बोलणे बंद करता येईल अशा यंत्राचा!''



**नौबत आता झडू दे, उंच उंच स्वर चढू दे। जय जय भारत विजयघोष हा, या गगनाला भिडू दे।।**


**जरूर वाचा : निसर्गायण - ले. दिलीप कुलकर्णी**, प्रदूषणाच्या समस्येवर समग्रपणे मांडलेले विचार, राजहंस प्रकाशन

**प्रायोजक - सौ. मंजुषा सावर्डेकर, पुणे**

# पाढ्यांचं गाणं

**– मल्हार अरणकल्ले**

दुपारी चार वाजण्याच्या सुमारास उन्हं उतरणीला लागलेली असत. डोंगरापलीकडं जाऊन डुबकी घेण्यासाठी सूर्य भराभर पावलं उचलत निघालेला असे. त्याचं असं झरझरतं जाणं शाळेच्या पडवीवरील सावल्यांच्या बदलत जाणाऱ्या आकारांवरून कळत असे. तिथं उतरलेल्या कौलांच्या नक्षीदार सावल्यांची पाऊलगती साऱ्या वर्गात आनंदाची झुळूक पसरवत राही. पडवीच्या जोत्यालगत अडकवलेल्या लोखंडी कडीला सावली टेकली की, गुरुजींचा *मूडही* दिवसभरापेक्षा बदललेला असे. शाळा भरताना ते कमालीचे कठोर दिसत. हजेरी झाल्यावर त्यांचा सूर काहीसा नरम होत जाई. मराठीचा धडा शिकवताना त्यांच्या शब्दांना लखलखती झुंबरं लगडलेली असत. कवितेच्या पानावर गुरुजींच्या सुरांवर लडिवाळ गंधाची फुलं खेळू लागत.



इतिहासाच्या पुस्तकाचा स्पर्श त्यांच्या आवाजाला गोष्टीवेल्हाळपणाचा नजराणा बहाल करी; तर भूगोलाचे धडे कधी काश्मिरातील दल सरोवरात लहरणाऱ्या शिकाऱ्यांतून सैर घडवून आणत. तर कधी टुंड्रा प्रदेशातल्या बर्फाळ रस्त्यांवरून रेनडिअरच्या गाडीतून आपण भटकत असल्याचा थंडीभरला काटेरी अनुभव थेट सामोरा येई. गुरुजींच्या उच्चारांत हिंदी भाषा अगदी मावशीच्या मायेसारखी वाटे.

गुरुजी खूपच छान शिकवत. सगळा वर्ग पुस्तकांच्या पानांतून पुढं पुढं जाताना कमालीचा रंगून गेलेला असे. धडा आधी वाचलेला असला, तरीही गुरुजींचं शिकवणं सुरू असताना सुरसपणाचे कितीतरी चंद्र हाताच्या ओंजळीत येऊन बसत. गुरुजींच्या हातात कधी कधी गोष्टींचं पुस्तक हसत असे. गुरुजी पाहताच इसाप, बिरबल, तेनालीरामा असं कुणी-कुणी आपल्याशी गप्पागोष्टी करायला आल्याचा आभाळभर आनंद होई.

आमची शाळा अशी आनंदभरली होती; पण दुपारची चार वाजण्याची वेळ सगळ्यांनाच खूप आवडत असे. पडवीच्या लोखंडी कडीला कौलारांची सावली पोहोचली की आम्ही दप्तरं आवरून बसत असू. गुरुजींचाही नूर पालटलेला असे. वर्गभर आनंदाचं वारं बहरू लागे; कारण ही वेळ पाढ्यांची! खरं म्हणजे पाढ्यांच्या गाण्यांची असे!!

वर्गातील बैठकव्यवस्था म्हणजे चार ओळी मुलांच्या आणि चार ओळी मुलींच्या. ही विभागणी एरवी लक्षातही यायची नाही; पण पाढ्यांचे सूर सुरू झाले, की स्पर्धेचं नवं रूप दिसू लागे. कुठल्यातरी एका बाजूनं पाढ्याची सुरुवात होई- 'बे एके बे.' दुसऱ्या बाजूनं पुढचा प्रतिसाद येई – 'बे दुणे चार.' मग त्यापुढचे प्रतिसादही क्रमानं येत राहत. 'बे दाहे वीस'चा टप्पा ओलांडला की 'तीन एके तीन'ला सुरावट काहीशी बदललेली असे. मग तो पाढा त्याच सुरांत तिसापर्यंत जायचा. दहाचा पाढा येईपर्यंत दोन्ही बाजूंचे आवाज चांगलेच खडे झालेले असत. अकरापासून



या मातीचे प्रेम आम्हाला, या मातीचा लळा। या मातीच्या खांद्यावरती, फूल जाहल्या कळा।।

जरूर वाचा : नेगल - ले. विलास मनोहर, वन्य प्राण्यांबद्दलचे कुतूहल, औत्सु य वाढवणारे पुस्तक, ग्रंथाली प्रकाशन

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. २५३८०४०६), पुणे




सुरांच्या झो  यांना चांगलाच वेग आलेला असे. कवितेतील शब्दांना चाल असते. ते उच्चारताना वाद्यांची किणकिण जाणवते. असाच विस्मयकारी अनुभव पाढ्यातील अंकही घेऊन येतात, हे आम्हाला पाढे म्हणताना जाणवत असे. नागपंचमीच्या सणाच्या दिवशी झाडाच्या उंच फांदीवर झोके बांधलेले असावेत आणि मित्रामित्रांनी जोडीजोडीनं उठाबशा काढत तो झोका वाऱ्याच्या उंच लहरी पकडण्यापर्यंत उंच जावा; अगदी तसाच थरार पाढ्यांचे अंक पुढं-पुढं सरकत जाताना आम्हाला जाणवत असे.

पाहता पाहता पाढ्यांचं गाणं तिसाच्या टप्प्यावर जाऊन पोहोचे. आरतीच्या अखेरीस मंत्रपुष्पांजली म्हणताना समूहस्वरांत जाणवणारा बदल होतो; तसा पाढ्यांचा पुढील आवाज वेगळा होई. तिसानंतर 'एक पाव एक, बे पाव अर्धा' अशी पावकी सुरू होई. पावकी, निमकी, पाऊणकी असं प्रवासगाणं वर्गभर नाचत असे. सगळी मुलं त्यात एवढी गुंगून गेलेली असत, की शाळेच्या पडवीवर उतरलेल्या सावल्या कुठल्या कुठं गेल्या असतील, ते पाहण्याची आठवणही होत नसे. धुरकट होत चाललेली संध्याकाळ वर्गाच्या खिड  यांतून डोकावू लागलेली असे. पाढ्यांचं गाणंही अखेरीकडे घरंगळत निघालेलं असे. शाळेचे शिपाई हळूहळू गोलाकार पितळी घंटेजवळ जाऊन उभे राहिलेले असत. हातात घड्याळ घेऊन मुख्याध्यापक त्यांच्या ऑफिसबाहेर आलेले असत. शाळा सुटण्याची वेळ झाली की ते एका बोटानं शिपायाला खूण करीत. लोखंडी बार उचलून तो घणघणते ठोके देई आणि त्या कोसळणाऱ्या आनंद-झडीत आमचं पाढ्यांचं गाणं विरून जाई.

दप्तर पाठीवर टाकून रस्त्यावरून धूम ठोकतानाही सोबत्यांच्या गळ्यांतून पाढ्यांचेच सूर उमटत असत. लांबचा रस्ताही मग त्या सुरांवर स्वार होई. त्या सुरांची रुमझुमती पैंजणओंजळ घेऊन घराच्या दाराशी कधी येत असू, त्याचं भानही राहिलेलं नसे.

***

**– मल्हार अरणकल्ले**
१०/२, गुरुजन सोसायटी,
कोथरूड, पुणे 411038



**या मातीतच जगणे आमुच्या अंगाअंगातुन भिने। हिचा लागता लळा आम्हाला, काय कशाचे उणे।।**

**जरूर वाचा : यंत्रमानव – संपा. सुबोध जावडेकर, अ. पां. देशपांडे,** विज्ञान आणि कल्पना यांचा अनोखा संगम, मनोविकास प्रकाशन

**प्रायोजक – सौ. रंजना सतीश कुलकर्णी, सातारा**

# ‘आशिया’मधल्या शांतिदूतांना नोबेल

२०१४ चे शांततेचे ‘नोबेल’ पारितोषिक आशिया खंडातल्या दोन शांतिदूतांना सन्मानपूर्वक देण्यात आले. बाल कामगारविरोधी चळवळीतले अग्रणी कैलाश सत्यार्थी (भारत) आणि तालिबान्यांच्या छळाला समर्थपणे तोंड देणारी मलाला युसूफझाई(पाकिस्तान) या दोघांना १० डिसेंबर २०१४, बुधवार रोजी ओस्लो (नॉर्वे) येथे झालेल्या विशेष समारंभात शांततेच्या नोबेल पारितोषिकाने सन्मानित करण्यात आले.



**मूळ नाव : – कैलाश शर्मा (कैलाश सत्यार्थी** )

**जन्म :** ११ जानेवारी १९५४, भारतातल्या मध्य प्रदेशातल्या ‘विदिशा’ येथे.

**शिक्षण :** • इले ट्रीकल इंजिनिअर (सम्राट अशोक टे नॉलॉजिकल इन्स्टिट्यूट)

• हाय व्होल्टेज इंजिनिअरिंगचे पदव्युत्तर शिक्षण

**विशेष कामगिरी :** १९८० मध्ये ‘बचपन बचाओ आंदोलन’ सुरू करून १४४ देशांमधल्या ८३००० पेक्षा जास्त बालकागारांना त्यांचे ह क मिळवून दिले.

**विशेष उद्‌गार :** ‘‘बालह काच्या चळवळीमध्ये मी माझे दोन सहकारी गमावले, पण मी नेटाने लढत आहे. जगाला खऱ्या शांततेचे तत्त्व शिकवायचे असेल, तर आपल्याला मुलांपासून सुरुवात करायला हवी. प्रत्येकाने स्वत:मधील बालमन शोधून त्याचे ऐकण्याची गरज आहे. जगातील प्रत्येक मुलाची स्वप्ने मोडणे ही एक प्रकारची हिंसाच आहे. न्याय, दया आणि समता ही तीन मूल्ये आपल्याला स्वातंत्र्यापर्यंत घेऊन जातात. मानवतेच्या कल्याणासाठी ही शांतीची हाक आहे.’’



**नाव : मलाला युसूफझाई**

**जन्म :** ११ जुलै १९९७ पाकिस्तानमधल्या ‘मिंगोरा’ जिल्ह्यातल्या ‘स्वात’ खोऱ्यात.

**शिक्षण :** हायस्कुलपर्यंत

**विशेष कामगिरी :** शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांच्या ह कांसाठी लढा.

**शौर्य :** ९ ऑ टोबर २०१२ रोजी शाळेच्या बसमधून घरी परत जाताना तालिबान्यांनी केलेल्या हल्ल्यात जखमी होऊनसुद्धा, मुलांच्या शिक्षणासाठी कार्य चालूच ठेवले.

**विशेष उद्‌गार :** ‘‘शिक्षणापासून वंचित मुलांच्या ह कांसाठी, मी उभी आहे. त्यांना सहानुभूती दाखवण्याची ही वेळ नव्हे. ही कृतीची वेळ आहे. मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याची अंतिम घटिका भरली आहे. कैलाश सत्यार्थी यांच्या समवेत पारितोषिक स्वीकारणे हा माझ्यासाठी गौरवाचा भाग आहे. एक भारतीय, एक पाकिस्तानी मुलांच्या ह कासाठी आणि शांततेसाठी एकत्र आलो आहोत. जगातील बलाढ्य देश युद्ध करण्यासाठी बंदुका देतात; पण ते पुस्तकं का देऊ शकत नाहीत? एक मूल, एक शिक्षक, एक लेखणी, एक पुस्तक जगाला बदलू शकते.’’

**आवाहन –** मुलांच्या ह कासाठी लढणाऱ्या वरील दोन संवेदनशील व्य तींना दि.१० डिसेंबर २०१४ ला नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुढील आठवड्यातच दि. १६ डिसेंबर २०१४ रोजी पाकिस्तानातील पेशावर येथील ‘आर्मी पब्लिक स्कूल’मधील १३२ निरागस, निष्पाप विद्यार्थ्यांची तालिबान या दहशतवादी संघटनेकडून अमानुषपणे हत्या करण्यात आली. या घटनेने अवघे जग सुन्न झाले.

धर्माच्या नावाखाली होणाऱ्या अशा दहशतवादी हल्ल्यांविषयी तुमच्या मनातही तीव्र प्रतिक्रिया उमटल्या असतील. त्याविषयी तुमच्या भावना, तुमचे विचार, तुमची मते शब्दबद्ध करून ‘छात्र प्रबोधन’कडे पाठवा. निवडक प्रतिक्रियांना आगामी अंकात प्रसिद्धी दिली जाईल.



**या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे। हे सर्व पंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे।।**

जरूर वाचा : **बाराला दहा कमी – ले. पद्‌मजा फाटक, माधव नेरूरकर,** अणुविज्ञानाची माहिती, राजहंस प्रकाशन

**प्रायोजक – डॉ. विनायक देसूरकर, पुणे**

# ‘स्वच्छता’ अभियान - संदेश

मा. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलेल्या ‘स्वच्छ भारत’ या आवाहनाला आपण सर्वांनी वैय तिक तसेच सामूहिक पातळीवर प्रतिसाद द्यायला हवा, असे मनापासून वाटते.

स्वच्छता कशाकशाची? याचा विचार करताना अनेक पैलू नजरेसमोर आले. स्वच्छ शरीर, स्वच्छ मन, शुद्ध विचार या गोष्टी स्वत:च्या विकासासाठी तर स्वच्छ पर्यावरण, स्वच्छ व्यवहार, स्वच्छ प्रशासन या गोष्टी ‘स्वच्छ भारत’ घडवण्यासाठी! विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या मान्यवरांचे या संदर्भातील स्वच्छतेविषयीचे विचार या व पुढील महिन्याच्या अंकात देत आहोत.

## आरोग्याची आस धरा !

उत्तम आरोग्यासाठी शारीरिक स्वच्छता ही प्राथमिक गरज आहे. निरुपयोगी व अपायकारक गोष्टी साठू न देणे म्हणजे स्वच्छता. दात घासणे, अंघोळ करणे यामुळे बाह्य शरीराची स्वच्छता होते तर वेळेवर शौचास जाणे, लघवीला जाणे, दीर्घश्वसन करणे; यांमुळे शरीराच्या आत तयार झालेली दूषित द्रव्ये बाहेर टाकली जातात. तसेच चॉकलेट्स, वडे, पावभाजी असे चमचमीत पदार्थ वरचेवर खाण्याचे टाळा. भाज्या-फळे खाणे आणि सूर्यनमस्कारासारखा सर्वांगसुंदर व्यायाम नियमित करणे; यांमुळे शरीराच्या आतील इंद्रियांची स्वच्छताही चांगली राहते.

– डॉ. रमेश गोडबोले

(वैद्यकीय क्षेत्र)

## पर्यावरणाचं रक्षण करा...

निसर्ग नावाच्या स्वयंशुद्धीकारक व्यवस्थेत ‘कचरा’ नावाची गोष्टच नसते: ती ‘बुद्धिमान मानवा’ची निर्मिती आहे! निसर्गात सेंद्रिय द्रव्यांचं विघटन होऊन त्यातली मूलद्रव्यं अन्नचक्रात समाविष्ट होतात. विकेंद्रित पद्धतीनं हे कार्य अहोरात्र चालू असतं. माणूस कचऱ्याची ‘समस्या’ निर्माण करतो ते दोन कारणांनी!! एक-अ-विघटनक्षम पदार्थ तयार करून आणि दोन- सेंद्रिय पदार्थही फार मोठ्या प्रमाणात एका जागी टाकून. माझ्या मते, या दोन्ही समस्यांना जबाबदार आहे विज्ञान आणि विकास. अ-विघटनक्षम पदार्थ तयारच न होणं (अनुद्भव), आणि विघटनक्षम पदार्थही विकेंद्रित पद्धतीनं तयार होणं हेच त्यावर खरे उपाय आहेत.

– दिलीप कुलकर्णी

(पर्यावरणतज्ज्ञ)

## मन विवेकबळे उमलावे...

विचार करणे हे एक शास्त्र व कला आहे. शास्त्र म्हणून विचार शुद्ध असला पाहिजे. विचाराला सुरुवात करताना अचूक, पुरेशी आणि आवश्यक अशी माहिती मिळवावी लागते. त्याबरोबर काही गृहीते धरावी लागतात. कोणत्याही गोष्टीविषयी भीती, राग, दु:ख, तिटकारा, हाव किंवा गैरसमजूत असेल तर विचारात अशुध्दता येते. या सर्व भावना मनातून काढून टाकून विचार करावा लागतो. कला म्हणून विचार सुंदरही असायला लागतो. त्यासाठी आदर, कृतज्ञता, भ ती, प्रेम, उत्तमता किंवा विशालता व्य त करणे हा विचारांचा हेतू असावा लागतो. त्यामुळे विचारशुद्धीसाठी पूर्वग्रहविरहित गृहीते, अचूक माहिती व सकारात्मक हेतू या तीन गोष्टी असाव्या लागतात. अशी विचारशुद्धी आपल्या विचारात आणण्याचा प्रयत्न सतत करावा लागतो.

गिरीश श्री. बापट

(संचालक, ज्ञान प्रबोधिनी)



नव्या शतकाचे गाणे, गाऊया हो सारे। मनाच्या आभाळी, चमकती स्वप्न तारे।।

जरूर वाचा : आम्ही शास्त्रज्ञ असे झालो - अनु. डॉ. पंडित विद्यासागर, संशोधकांचे प्रेरणादायी अनुभव, गंधर्ववेद प्रकाशन

प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली



# नव्या महाराष्ट्र सरकारपुढील आव्हाने

**– ऐश्वर्या शेवाळे**

२०१४ हे वर्ष भारतीय लोकशाहीच्या दृष्टीनं अतिशय महत्त्वाचं आणि मैलाचा दगड म्हणून ओळखलं जाईल, यात शंका नाही! स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच काँग्रेसेतर पक्षानं संपूर्ण बहुमत मिळवलं. युती-आघाडीच्या जमान्यात निवडणुका होऊन अतिशय सश त असं सरकार दिल्लीत स्थानापन्न झालं.

भारताप्रमाणेच महाराष्ट्रातही सप्टेंबर-ऑ टोबरमध्ये धूमधडा यात लोकशाहीचा हा उत्सव पार पडला. 'अरे कुठे नेऊन ठेवलाय, हा महाराष्ट्र माझा?' पासून ते 'सर्वात पुढे – महाराष्ट्र माझा' सारख्या घोषणा, ज्येष्ठा-श्रेष्ठांच्या सभा आणि वर्तमानपत्रापासून ते *Facebook-Whatsapp* पर्यंत झालेला प्रचार; या सगळ्याचा अनुभव तुम्ही घेतला असेल आणि कदाचित तो *enjoy* सुद्धा केला असेल!

१९ ऑ टोबर २०१४ ला निवडणुकीचा निकाल लागला आणि महाराष्ट्राची सूत्रे कोणाकडे जाणार हे निश्चित झाले. महाराष्ट्राचे अठरावे मुख्यमंत्री म्हणून विराजमान झालेल्या मा. देवेंद्र फडणवीस यांच्याकडून शेतकरी, सामान्य जनता, कारखानदार, कंत्राटदार, सरकारी कर्मचारी, साहित्यिक या सर्वांनीच अपेक्षा ठेवल्या आहेत.

२०१४ च्या निवडणुकीपूर्वीचा महाराष्ट्राच्या राजकारणाचा इतिहास बघता असं चित्र दिसतं की, मागील पाच वर्षांमध्ये 'आदर्श' सरकारकडून उघडकीस आलेले घोटाळे असतील किंवा सातत्याने बदलणारी 'नेतेपदं' असतील; त्यामुळे काँग्रेस सरकार जनतेच्या अपेक्षांची पूर्तता करू शकले नाही. मागच्या पाच वर्षांत उघडकीस आलेल्या घोटाळ्यांमुळे काँग्रेस सरकारवरचा जनतेचा विश्वास कमी झाला. घोटाळ्यांपासून विकासापर्यंतचं हे राजकारण सामान्य नागरिकांना विचार करायला लावणारं होतं.

विसावे शतक विज्ञान तंत्रज्ञानाचे शतक समजले जाते. महाराष्ट्रामध्ये अनेक उद्योग या शतकांत उभारण्यात आले. परंतु मागील काही वर्षांत अनेक उद्योग राज्याच्या बाहेर चालले आहेत. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर त्याचा परिणाम झालेला दिसून येत आहे.

**शेती व उद्योगधंदे –**

• महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही बहुतांश शेतीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांवर मागच्या काही वर्षांमध्ये झालेलं कर्ज आणि त्याची परतफेड होऊ न शकल्यामुळे शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या, यांचे प्रमाण फारच भयावह आहे. शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या *packages* मुळे त्यांना आर्थिक स्थैर्य आलेलं दिसत नाही. परिणामी आत्महत्येचं प्रमाण कमी झालं, असंही दिसत नाही. ही एकूण परिस्थिती बघता शेतकऱ्यांची वीजबीले व त्यांचे सावकारी कर्ज फेडण्याचे मोठेच आव्हान सरकारपुढे आहे.

केंद्रातून बऱ्याच योजना राज्यात येतात; पण काही योजना कागदावरच राहतात! केंद्राकडून विकासासाठी






**प्रियतम अमुची भारतमाता, आम्ही सारी तिची मुले। रंग वेगळे, गंध वेगळे, तरीही फुलती सर्व फुले!**

**जरूर वाचा : या जनुकांमध्ये दडलंय काय? – ले. दीपा जोशी,** जनुकशास्त्र या विषयावरचे पुस्तक, लोकवाङ्मय गृह प्रकाशन

**प्रायोजक – डॉ. प्रियदर्शी सावंत, बोरीवली**





येणारा काही निधी प्रत्यक्ष विकास कामात खर्ची न पडता तो केंद्राला परत जातोय. त्या योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची अपेक्षा जनता बाळगून आहे.

• अनेक उद्योग व्यवसाय बाहेरच्या राज्यांमध्ये जात आहेत. उदा. किर्लोस्कर टोयोटा, कोरियन कार कंपनी इ. या साऱ्या मोठ्या कंपन्यांचा महाराष्ट्राबाहेर जाण्याचा परिणाम रोजगार आणि अर्थव्यवस्थेवर न कीच झालेला दिसून येत आहे. वार्षिक रोजगार निर्मितीमध्ये महाराष्ट्राचं भारतातलं स्थान घसरत आहे. संपलेल्या आर्थिक वर्षात तर रोजगार निर्मितीत ओरिसा आणि बिहारनंसुद्धा महाराष्ट्राला मागं टाकलंय. महाराष्ट्राचा आर्थिक स्तर उंचावला जावा म्हणून नवीन सरकार न कीच कार्यक्षम राहील, अशी आशा करूया. उद्योगधंद्यात वाढ करून अर्थव्यवस्था सुधारणे हे मोठे आव्हान नव्या सरकारसमोर आहे. रखडलेला *metro project* देखील नवीन सरकार रुळावर आणेल अशी अपेक्षा आहे. स्थानिक सेवा कर (LBT) रद्द केला आणि टोलमु त महाराष्ट्र केला तर सरकारी तिजोरीचं उत्पन्न कमी होणार आहे, ती तूट कशी भरून काढायची हा मोठा प्रश्न नवीन सरकारसमोर आहे.

**मूलभूत शैक्षणिक सुविधा –**

साक्षरतेच्या बाबतीत क्र. २ वर असलेला महाराष्ट्र आता क्र. ५ वर पोहोचलाय. 'महाराष्ट्रातले दहावी – बारावीचे अभ्यासक्रम दिल्लीच्या तुलनेत कमी दर्जाचे आहेत', असं म्हटलं जातं. दरवर्षी मेडिकल आणि इंजिनिअरींग महाविद्यालयांच्या प्रवेशाच्या धोरणाबाबत संदिग्धता असते. त्याबाबत निश्चित असे धोरण राबवण्याचे सरकारचे आगामी काळात प्रयत्न असतील. IIM सारखी संस्था महाराष्ट्रामध्ये येणार आहे. पण मोठ्या शैक्षणिक संस्था आणून प्रश्न सुटतीलच असे नाही. मूलभूत शिक्षण, शिक्षणासाठी पोषक वातावरण तयार करणं गरजेचं आहे. अन्न, वस्त्र आणि निवारा याबरोबरच 'शिक्षण' हीदेखील व्य तीची मूलभूत गरज बनायला पाहिजे. महाराष्ट्राला प्रगतिपथावर न्यायचे असल्यास मूलभूत शैक्षणिक सुविधांवर भर देणं गरजेचं आहे.

**मूलभूत नागरी सुविधा –**

**वीज –** विजेच्या बाबतीत महाराष्ट्र आधि य असलेलं राज्य होतं. इतर राज्यांना महाराष्ट्र वीजपुरवठा करायचा. आता आपल्यावर इतर राज्यांकडून वीज घेण्याचे दिवस आले आहेत. महाराष्ट्रात मागच्या दहा वर्षात वीज प्रकल्पच सुरू झाला नव्हता. आता नव्याने काही वीज प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. वीजनिर्मितीच्या बाबतीत नवीन सरकारने गांभीर्याने लक्ष घातले पाहिजे, अशी जनेतकडून अपेक्षा व्य त होत आहे.

**रस्ते –** महाराष्ट्राच्या मोठ्या शहरांमधील सर्वात मोठी समस्या म्हणजे वाहतूकसमस्या. नवीन सरकारने *Mumbai urban infrastructure project* या अंतर्गत ३ मोठे पूल, २ रेल्वे पूल, फ्लायओव्हर्स आणि १३१.५० कि.मी. चे मोठे रस्ते बांधण्याचे काम हाती घेतले आहे.





जरूर वाचा : सूर्यमालेतील सृष्टी चमत्कार - ले. मोहन आपटे, आपल्या अंतराळ विश्वाचे ज्ञान देणारे, राजहंस प्रकाशन

प्रायोजक - श्री. सौरभ सुधीर दप्तरदार, पुणे

हे काम पूर्ण झाल्यास मुंबई शहराची वाहतुकीची समस्या काही प्रमाणात सुटू शकते. त्याबरोबरच नागपूर विमानतळाला रस्ते व रेल्वेची जोड देण्यासाठी उभारण्यात आलेला 'मिहान' हा रखडलेला प्रकल्प पूर्ण करण्याचे आव्हान नवीन सरकारपुढे आहे. या व यांसारख्या अनेक प्रकल्पांमुळे महाराष्ट्रातील वाहतुकीची समस्या काही प्रमाणात कमी होईल. आर्थिक विकास होण्यासाठीसुद्धा दळवळणाचे हे प्रकल्प निश्चितच मदत करतील.

**पाणी –** महाराष्ट्र म्हटलं, की अनेकांच्या डोळ्यांसमोर उभा राहतो तो म्हणजे इथे पडणारा दुष्काळ! खेड्यापाड्यात अजूनही पिण्याच्या पाण्यासाठी महिलांना दूरपर्यंत पायपीट आणि वणवण करावी लागते; हे वास्तव आहे. हे चित्र बदलण्यासाठी राज्यातील सरकार केंद्र सरकारच्या नदी जोड प्रकल्पात समाविष्ट होणार आहे. पाणीटंचाईचा प्रश्न सोडवून महाराष्ट्राला या समस्येतून मु त करणे हे नवीन सरकारपुढे आव्हानच आहे.

**सामाजिक परिस्थिती –**

२००१ च्या जनगणनेच्या संदर्भानुसार स्त्री-पुरुष प्रमाणाच्या गुणोत्तरात घसरण झालेली दिसून येते. गर्भपात, माता-बालकांचे उपचाराअभावी होणारे मृत्यू, कुपोषण आणि 'नकोशी' मुलगी या सर्व सामाजिक परिस्थितीचं भान जनतेला देणं गरजेचं आहे. मोठमोठ्या शहरांमध्ये वाढत चाललेली गुन्हेगारी आणि त्यातून होणारी टोळीयुद्ध रोखणं, हेसुद्धा एक सरकारपुढील आव्हान आहे.

**पुढे काय? –**

राजकारणामध्ये पारदर्शीपणा आला नाही, तर मागील ५ वर्षांमध्ये झालेल्या घोटाळ्यांची पुनरावृत्ती होण्यास वेळ लागणार नाही. भारतासारख्या लोकशाही असलेल्या देशात प्रत्येक योजनेचा हिशोब ठेवून उत्तरदायी सरकारी व्यवस्था उभी करणं गरजेचं आहे. असं झाल्यास राजकारणाला एक वेगळी दिशा मिळेल. मा. मुख्यमंत्र्यांनी शपथविधीच्या दिवशीच अशी पारदर्शकता यावी म्हणून 'सेवा हमी विधेयक' आणण्याचं घोषित केलं आहे. पारदर्शकतेच्या दृष्टीनं टाकलेलं हे पाऊल निश्चितच स्वागतार्ह आहे.

१९१९ मध्ये मा. जदुनाथ सरकार यांनी एक अतिशय महत्त्वपूर्ण विधान केलं होतं. *'या वेगानं जर मराठ्यांचा (महाराष्ट्राच्या सध्याच्या भागात राहणाऱ्यांचा) विकास सुरू राहिला, तर पुढील शंभर वर्षांत भारताच्या विकासात सर्वात मोठे योगदान त्यांचं राहील यात शंका नाही.'* सरकार यांच्या या विधानाला २०१९ मध्ये शंभर वर्षं पूर्ण होतायत आणि योगायोगानं तोपर्यंत नव्या सरकारचा कलावधीसुद्धा!

दुसरं महत्त्वाचं विधान म्हणजे आपल्या मा. पंतप्रधानांचं!! *'भारताला विकसित करण्याचं नेतृत्व महाराष्ट्रानं करायला हवं... महाराष्ट्राच्या विकासाशिवाय भारताचा विकास अशक्यच आहे!'*

या दोन्ही विधानांमधून भारताच्या विकासामधलं महाराष्ट्राचं योगदान किती महत्त्वपूर्ण आहे याचा अंदाज आपल्याला येईल. देशाची आर्थिक राजधानी असणारा, शैक्षणिक, सांस्कृतिक, वैचारिक क्षेत्रांमध्ये अग्रेसर असणारा महाराष्ट्र आता कात टाकून नव्या जोमानं प्रगतिपथावर जावा अशी आपल्या सर्वांचीच इच्छा आहे.

**थोड यात आव्हाने आणि अपेक्षा –**

मा. देवेंद्र फडणवीस यांच्या नवीन सरकारनं महाराष्ट्राची प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न करावा. भारतात आपले राज्य सर्व क्षेत्रांमध्ये आघाडीवर कसे राहील, यासाठी प्रयत्न करायला हवेत. निवडणूक काळात जनतेला दिलेली आश्वासनांची पूर्ती या पाच वर्षांत सरकारने केली तर महाराष्ट्राच्या विकासाला एक नवीन दिशा न कीच मिळेल. प्रत्यक्षात असा विकास घडण्यासाठी स्थिर सरकारचा पर्याय आपणच मतपेटीतून दिला आहे. म्हणूनच,

*दारिद्र्याच्या उन्हात शिजला,*
*निढळाच्या घामाने भिजला,*
*देश गौरवासाठी झिजला,*
*दिल्लीचेही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा !!*

असा सार्थ उद्घोष अभिमानानं करण्यासारखी परिस्थिती महाराष्ट्रात यावी, यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करूया.

***

**– ऐश्वर्या शेवाळे**
५३ बी, हनुमान नगर, सेनापती बापट रस्ता, पुणे 411016

**लेखन मार्गदर्शन – सौगंध देशमुख**




**मान वाढवू, शान वाढवू, कीर्ती दिगंत नेऊ । अभिमानाने मातृभूमीची, गौरवगीते गाऊ ।।**

**जरूर वाचा : सुनीता विल्यम्स - अनु. चित्रा वाळिंबे**, अंतराळवीर सुनीता विल्यम्स यांची प्रेरणादायी जीवनगाथा, मेहता प्रकाशन

**प्रायोजक - श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे**




## सोडवा हे शब्दकोडे



**आडवे शब्द**

२. तापमान, डो याची कटकट
४. दुष्कृत्य, वाईट काम
६. वडील, पिता
८. हस्तकौशल्य, जादूगार ही करतो
९. .... जमणे, एक मिश्रण
११. वस्त्र, कपडा
१२. एक गाव
१४. पूर्वीच्या राजांचे वाहतुकीचे साधन
१५. तारण ठेवणे
१६. स्पष्टीकरण
१७. आणि
१९. माझे (काव्यात)
२१. एक तंतूवाद्य
२३. विचार, निवडणूकीत महत्त्वाचे
२५. पाककुशल स्त्री, एक पक्षी
२६. नात्याने, वयाने लहान
२७. कांद्याची...याची भाजी करतात
२८. पैंजण
२९. डाव्या हाताने काम करणारी स्त्री
३०. फळाच्या आतील टणक भाग, गावठी भाषेत 'सुद्धा'

**उभे शब्द**

१. देव, ईश्वर
३. सकाळच्या आधीचा समय
४. एक संख्या
५. पोबारा, पलायन
७. युद्धात केला जाणारा समझोता
१०. बासरी, मुरली
११. पादत्राण
१३. स्वत: इच्छिलेले मरण
१५. उष्ण
१६. कृती
१८. इच्छापूर्ती करणारी पुराणातील गाय
२०. जखमेतून वाहणारा स्त्राव
२१. साथ, सोबत
२२. एक कडधान्य
२४. मार्गदर्शक, वाट दाखवणारा
२५. विड्यात खाल्ली जाते, एखाद्याला मारण्यासाठी पैसे देऊन दिलेले काम
२६. शस्त्राला व पाण्याचीसुद्धा असते

– **कु. मृण्मयी फडके** (इ. ७ वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे

**ओळखा मी कोण?**

कैद तुम्ही करता माझ्यात आठवण
परि ना एक करू शकणार भावनांची साठवण
छोटे प्रतिरूपच तुमचे मी
परी द्विमितिय माझी स्थिती

सकळांस कळो मानवता अन् राष्ट्रभावना । हो सर्व स्थळी मिळूनि समुदाय प्रार्थना ।।

जरूर वाचा - दक्षिणरंग, ले. मीना प्रभू, दक्षिण अमेरिकेच्या अनोख्या सफरीचे प्रवासवर्णन, मेहता प्रकाशन

प्रायोजक - श्री. निखिल धारवाडकर, बंगलोर

**मुलांचे पान**


# अंधाराचे गाणे...

*अंधारल्या रात्रीला*
*मी भेट दिवसाची देते*
*माझे अंधारचे गाणे*
*उजेडाच्या हाती देते।*

*जीव जळू दे जळू दे*
*राखराख ती होऊ दे*
*तिच्यातून उगवते*
*पुन्हा पुन्हा जन्म घेते।*

*झळ वेदनांची येता*
*बळ पायात येऊ दे*
*पाय जीवाचे करून*
*पुढे पुढेच धावू दे।*

*पानगळ पानगळ*
*शिशिर हा अवखळ*
*ओंजळीत देते त्याच्या*
*हिरव्या वसंताचे दान।*



– **शिवानी वाबळे** (इ. ८ वी), ४५ देशमुखनगर, यावल रस्ता, चोपडा, जि. जळगाव 425109

## हसा हसा...

### अनोळखी

बसमध्ये खच्चून गर्दी असते. एक माणूस पुढच्या माणसाच्या खिशात हात घालतो. पुढच्या माणसाच्या लक्षात आल्यावर तो चिडून म्हणतो,
''तुम्ही माझ्या खिशात हात का घातला?''
''मला काड्यापेटी हवी होती,'' मागचा प्रवासी म्हणाला.
''मग तुम्ही ती मला मागायला हवी होती,'' पुढचा प्रवासी म्हणाला.
''माफ करा. मी अनोळखी माणसाशी बोलत नाही!''

### दूरदृष्टी

सामान्य ज्ञानाच्या तासाला शिक्षक विचारतात,
''कुणाचे डोळे तीक्ष्ण असतात. माणसाचे की पक्ष्याचे?''
एक मुलगा लगेच उत्तर देतो, ''पक्ष्याचे. त्यांची दृष्टी चांगली असते.''
शिक्षक विचारतात, ''कशावरून?''
''कारण कुठल्याच पक्ष्याला चष्मा लागलेला मी पाहिला नाही !''



**एकत्वाचा दीप तेवतो, अखंड अविरत या भूमीवर। पवित्र माती, माता अमुची, मानवतेचे इथेच मंदिर।।**

जरूर वाचा : **पूर्णत्वाचे प्रवासी - ले. प्रा. शरद कुलकर्णी**, नातवाला आजोबांनी लिहिलेली पत्र, राजहंस प्रकाशन

**प्रायोजक - श्री. अजित कानिटकर, पुणे**



# ज्ञानेश्वरी

– गायत्री मुळे

**स्नेहसंमेलनात एकांकिका सादर करताना सादरीकरणाबरोबरच नेपथ्यालासुद्धा महत्त्व असते. कितीतरी गोष्टींचा पूर्वतयारी म्हणून तपशीलात विचार करावा लागतो. हे सोबतची एकांकिका वाचताना तुमच्या लक्षात येईल.**

---

पार्श्वभूमी – ज्ञानेश कुंभार हा मतिमंद मुलगा आहे. शाळेतला अभ्यास किंवा इतर गोष्टी तो सगळ्या मुलांबरोबर समजून घेऊ शकत नाही. त्याचं शरीर मोठ्यांचं पण मन मात्र लहान मुलाचं आहे. बोलताना अडखळतो. त्याला कोणी मित्र नाहीत. जन्मापासून हा असाच. त्याच्या गावात मतिमंदांसाठी वेगळी शाळा नाही. त्यामुळे तो सामान्य मुलांच्याच शाळेत जातो. आणि अनेक अडचणींना तोंड देतो.

**पात्रे –** **१) ज्ञानेश कुंभार** **२) आई**
**३) राधामावशी** **४) शिक्षिका १**
**५) शिक्षिका २** **६) मुलगा १**
**७) मुलगा २** **८)आदित्य कौशिक**
**९) प्रमुख पाहुणे.**

संहितेत (स्क्रिप्ट मध्ये)लिहिलेल्या काही शब्दांचा नाटकाच्या दृष्टीने अर्थ –

***1) Mime (माईम)* –** म्हणजे बोलण्याची, टाळ्या वाजवण्याची किंवा कोणतीही कृती करणे पण आवाज येणार नाही अशी काळजी घेणे.

***2) Flashback (फ्लॅशबॅक)* –** नाटकाला वर्तमान काळातल्या प्रसंगातून भूतकाळात घडून गेलेल्या प्रसंगात घेऊन जाणे.

***3) Frames (फ्रेम्स)* -** छोटे छोटे प्रसंग दाखवून नाटकाला वेग देणे. उदाहरणार्थ, एका महिन्याच्या कालावधीत आईनं ज्ञानेशला वाचायला, पोहायला, मडकी करायला शिकवलं. तर हा संपूर्ण एक महिना नाटकात दाखवणं श य नाही. म्हणून तीन छोट्या प्रसंगांनी तो कालावधी कशाप्रकारे गेला हे दाखवायचं. *Frame* च्या सुरुवातीला रंगमंचावर प्रकाश असावा. Frame संपताच प्रकाश जावा. प्रसंग घडताना संगीताचा आवाज कमी करावा व अंधारात वाढवावा.

**तयारी –** १) बासरीचे संगीत.

२) *Frame* साठी. पळत्या चालीचं संगीत

३) एकांकिकेतला प्रवेश २ हा *Flashback* मध्ये उघडतो. यासाठी ज्ञानेशचं काम करणाऱ्यानं प्रवेश १ साठी



वंशज आम्ही भगीरथाचे। हात आमुचे पोलादाचे। एकसंघता हे कार्य आमुचे ।।

जरूर वाचा : जल आक्रमिले - ले. सुमेध वडावाला, लहान वयात सागरी झेप घेणाऱ्या मुलीची प्रेरणादायी कथा, राजहंस प्रकाशन.

प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई

घातलेल्या फुलपँटच्या आत शाळेच्या गणवेषाची हाफपँट घालावी. जेणेकरून प्रवेश १ नंतरच्या अंधारात वेषभूषा बदलण्यास मदत होईल.

**प्रवेश – १**

(पडदा अजून उघडलेला नाही. १५ ऑगस्टला दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात जसा जन–गण–मन चा बँड वाजतो, तसं संगीत सुरू होईल. गाण्याच्या म्हणजे राष्ट्रगीताच्या कडव्यापासून पडदा हळूहळू वरती जाईल. आणि रंगमंचावर प्रकाश यायला लागेल. स्वच्छ गणवेश घातलेली मुले आणि कार्यक्रमासाठी आलेले प्रमुख पाहुणे, शिक्षक सर्वजण झेंड्याला सलाम करत सावधान स्थितीत उभे असतात. राष्ट्रगीत संपतं. शाळेच्या शिक्षिका माईकवरून अनाऊन्स करतात.

**शिक्षिका १ :** एक साथ विश्राम होंगे विश्राम !
(सर्वजण विश्राम स्थितीत येतात.)
सावधान, बैठेंगे बैठ जाओ ! (सर्वजण बसतात.)

**शिक्षिका :** विद्यार्थी मित्रांनो, आज १५ ऑगस्ट ! आपल्या देशाचा स्वतंत्रता दिवस. कवींनी भारताचं, या मातीतल्या थोरा–महानांचं वर्णन करताना म्हटलंय–
*परंपरा ही शूर–वीरांची नर–रत्नांची खाण ।*
*इथे निपजले राजे योद्धे मुत्सद्दी विद्वान ।।*

आज या दिनानिमित्त, अशाच एका शूर मुलाचा आपण सत्कार करणार आहोत... आणि मला सांगायला अतिशय आनंद होतोय, की हा मुलगा आपल्याच शाळेचा विद्यार्थी आहे. जोरदार टाळ्यांनी स्वागत करूया – 'ज्ञानेश कुंभार' याचं ! (विद्यार्थी, प्रमुख पाहुणे, शिक्षक वर्ग सगळेजण कडकडून टाळ्या वाजवतात... आणि काळ्या रंगाची फुलपँट, पांढऱ्या रंगाचा शर्ट घातलेला मुलगा लाजत, त्या गर्दीकडे बघत उभा राहतो... घाबरत–घाबरत पुढे सरकतो. टाळ्या तशाच वाजत राहतात. रंगमंचावरचा प्रकाश हळूहळू कमी होतो... अंधारातही टाळ्यांचा आवाज तसाच... (त्याच आवाजात परत एकदा रंगमंचावर प्रकाश येतो.)

**प्रवेश – २**

आता प्रवेश फ्लॅशबॅकमध्ये उघडतो. तीच शाळा, मुले तशीच बसली आहेत. प्रमुख पाहुणे बदललेले आहेत. *अनाऊन्समेंट* करणाऱ्या शिक्षिका दुसऱ्या आहेत. आधीच्या प्रवेशात ज्ञानेश कुंभार जिथे उभा होता, त्या जागी 'आदित्य कौशिक' नावाचा मुलगा आहे. त्याचा गणवेश अगदी स्वच्छ आहे. त्याने नीटनेटके आवरले आहे. ज्ञानेश मुलांच्या रांगेत सगळ्यात शेवटी बसला आहे. शाळेचाच गणवेष. डो याचा भांग विस्कटलेला, शर्ट बाहेर आला आहे. आदित्य बक्षीस घेण्यासाठी पुढे जाऊन उभा राहतो. सगळे अजूनही अशाच टाळ्या वाजवत आहेत.

**शिक्षिका २ :** मित्रांनो, आदित्यने याही वर्षी गणित विषयात १०० पैकी १०० गुण मिळवून सलग तीन वर्षे पैकीच्यापैकी गुण मिळवण्याचा विक्रम केला आहे. आज झेंडावंदनानिमित्त ही ढाल देऊन आपण त्याचं कौतुक करूया. आदित्य कौशिक !

(आदित्य बक्षीस घ्यायला जाऊ लागतो तसा ज्ञानेश मागच्या रांगेतून पळत पळत येतो आणि आदित्यला जोरात ढकलतो. तो पडतो. वाजणाऱ्या टाळ्या अचानक थांबतात. ज्ञानेश, आदित्यला पायाने लाथा मारू लागतो.)

**ज्ञानेश :** मला बी पायजे बक्षीस. तूच कामून घेतो रे दरसाल? आये, मला पायजे बक्षीस...! तुझ्यापरीस मोठा हाय म्या, तू यायच्या ३ साल आधीपासून म्या, हतंय... मला का नाही देत?
(हे म्हणताना तो रडत असतो, डोळे पुसत असतो, तरीही रागारागाने बोलत असतो. विंग मधून त्याची आई धावत येते. ठिगळांची नऊवारी नेसलेली, कपाळाला कुंकू नसलेली, बांगड्या नसलेली. ती ज्ञानेशला मागे खेचू लागते. पण ज्ञानेशचा वाढलेला जोर ती आवरू शकत नाही.)



आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई । जात वेगळी नाही अमुचा धर्म वेगळा नाही ।।

जरूर वाचा : वाट तुडवताना - ले. उत्तम कांबळे, पथदर्शी आत्मचरित्रपर पुस्तक, मनोविकास प्रकाशन

प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे

**आई :** ज्ञाना, असं करू नये बाबा, आरं... आरं सोड त्याला, ज्ञानोबा... (पण तो काही ऐकत नाही... शेवटी आई चिडते... त्याच्या पाठीत दणके घालते.) कारट्या, जीव घेशील त्याचा. (आई पूर्ण ताकदीनिशी त्याला मागे ओढते. तसा आदित्य उठतो. ज्ञानेशला जोरात ध का देतो. आई आणि ज्ञानेश दोघंही मागे ढकलले जातात.)

**आदित्य :** ए... अर्ध्या डो याचा, त्यासाठी दरवर्षी अभ्यास करावा लागतो. (कुत्सित हसतो...) तू काय अभ्यास करणार म्हणा... त्यासाठी अ कल लागते अ कल. बिनअकलेचा कांदा...!

(ज्ञानेश चिडतो. पुन्हा त्याच्यावर धावून जायला लागतो. पण आई त्याला थोपवते. इकडे सगळ्या मुलांत, शिक्षकांमध्ये कुजबूज सुरू झालेली असते. आदित्य अंगावरची धूळ झटकतो आणि बक्षीस घ्यायला जातो. सर्वजण टाळ्यांचं माईम करतात. बासरीचं एक दु:खद संगीत सुरू होतं. आई पदरानं डोळे पुसत त्याला बाजूला घेते. तोही रडत असतो.)

**ज्ञानेश :** बिनअकलेचा म्हणतू... आये मी शाना हाय ना गं? तूला काय बी तरास देत न्हाई ना... पर साळंतले समदे असंच म्हणत्यात... वेडा..., वेडा...!

**आई :** (त्याच्या डो यावरनं हात फिरवते) नाही हां... शानाच हाय माझा ज्ञानोबा. चल... चल... घरला... (एका बाजूला आदित्य ती ढाल घेऊन धरत आहे. सर्वजण टाळ्या वाजवत आहेत आणि ज्ञानेश व आई रंगमंचावरून संथ पावले टाकीत जात आहेत. रंगमंचावर अंधार. दु:खद संगीत चालूच. प्रवेश संपतो.)



**प्रवेश ३**

(रंगमंचावर प्रकाश येतो. ज्ञानेशाच्या घरात प्रवेश उघडतो. आई–चूल फुंकतीये, भाकऱ्या चालू आहेत. ती भाकऱ्या करताना प्रचंड खोकतीये. ज्ञानेश बाजूला अंगाचं मुटकुळं करून झोपला आहे. इत यात दारातून आईची मैत्रिण राधा मावशी येते.)

**राधा :** नर्मदे... हाईस ना घरात?

**आई :** कोण? (खोकला मधेच थांबवत विचारते.)

**राधा :** (आत येते.) अगं मी.

**आई :** राधा? ये बाई ये... आज हिकडं कुणीकडं वाट चुकलीसा?

**राधा :** ज्ञानूबा कसाय? वेणू सांगत हुती, आज मारलं म्हणे एका पोराले.

**आई :** (खोकते. खोकल्याची धाप मधेच थांबवत) बक्षीस हवं हुतं त्याला. दरसाल हुशार पोरांना देत असती साळा काई बाई. समदे टाळ्या वाजिवत्यात, कवतिक करत्यात. आपले ज्ञानोबा पडले असे अर्ध्या डो याचे. (परत खोकला येतो.) ना धड बोलाया येतंय, ना वागाया. या बरीस १५ वर्षाचं व्हील... आता आता कुठे सोत्ताच्या हातानं खाया जमतंय त्याला... यकादी गोस्ट शिकवावी म्हटलं तर सारखं वरडावं लागतंय, मारावं लागतंय. जीव न्हाई व्हत माझा. जन्माचंच अपंगत्व असल्यावर त्यो तरी काय करनार



फुलाफुलाचे गाणे गाऊ, फुलवू आपुली कळी। एकच आपुला देव, आपुली एकच जातकुळी।।

जरूर वाचा : दुर्दम्य - ले. गंगाधर गाडगीळ, लोकमान्य टिळकांच्या जीवनावरची चरित्रात्मक प्रदीर्घ कादंबरी, सुपर्ण प्रकाशन

प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिस्टन, अमेरिका

हाय? (राधा बसल्या बसल्या ज्ञानेशचं डोकं कुरवाळत आहे.) (आई रडू लागते. तशी राधा तिच्या जवळ सरकते. तिच्या पाठीवरून हात फिरवते.)

**राधा :** रडू नकोस बाई... तुझं सारं दु:खं, कष्ट, तुझा परमाणिकपणा (वर बोट करून) त्यो बघतोय ना... रडू नगंस. आपल्या ज्ञानूबाचं मन कसं निर्मळ हाय एकदम. आपल्यावानी धडधाकट मानसाच्या मनात येत्यात तसं पाप चु कून शिवत नाई त्येच्या मनाला. चांगलं व्हील बरं.

**आई :** तसं झालं तर मी मराया मोकळी व्हीन बाई... (खोकते)

**राधा :** अगं, अगं तिन्हीसांजेला असं येड्यावानी बोलू नये आन् हे जीवाचं काय रान करून घेतलयसा? खोकून पार खंगून गेलीस की. काल पंचायतीच्या दवाखान्यात गेली होतीस ना. काय म्हंगालं डागदर? दवा दिली नवं लिऊन?

**आई :** बरी आठवण केलीस. त्यो कागूद ठेवलाय बग तिकडं अन् मड याखाली पैकं हायत. तेवढी दवा आनून देतीका दुकानातून?

**राधा :** हो देते की. (असं म्हणत उठते. मड याखालचे पैसे घेते. आणि औषधे लिहून दिलेली चिठ्ठी वाचू लागते. इकडे आई खूप खोकते आहे.)

**राधा :** (स्वत:शीच) काय नाव हाय गोळीचं... (आणि एकदम चपापते. खोकणाऱ्या आईकडे आश्चर्याने बघते. घाबरून विचारते –) नर्मदे ह्येच हाइत का नाव गोळ्यांचं?

**आई :** (खोकताना फ त मानेनंच हो म्हणते.)

**राधा :** (जवळ जाते, घाबरत विचारते–) नर्मदे, खोकताना रगात येतंय का कधी–मधी?

**आई :** (खोकला थांबवण्यासाठी पाणी पिते.) हा... उगं थोडं – थोडं.

**राधा :** (जवळ–जवळ किंचाळतेच) नर्मदे ऽऽऽ टी.बी. झालायन् तुला... माईला पन याच दवा दिलत्या गं डागदरनं... या अशा खोकल्यानंच जीव घ्येतला तिचा नर्मदेऽऽ

**आई :** (प्रचंड घाबरते...) (राधाचा हात घट्ट धरते. तिचे डोळे तारवटतात आणि रडायला लागते... ज्ञानेश घाबरून उठतो.)

**ज्ञानेश :** (आईच्या जवळ येत) आये. काय झालं तुआ? म्या नाय परत तरास देनार. का म्हणून रडती? मावश्ये?

**आई :** (आई त्याला जवळ घेते.) राधे माया ज्ञानोबाचं कसं व्हील गं मायामागं? (हुंदके देऊन रडते. रंगमंचावर अंधार)

**प्रवेश – ४**

(पुन्हा एकदा प्रवेश ज्ञानेशच्याच घरात उघडतो. आई चाकावर मडकं करतीये.)

**आई :** ज्ञानोबा, ए ज्ञानोबा हिकडं ये... (खोकते)

**ज्ञानेश :** (आत येत म्हणतो)आये, हे चिडवत्यात मला.

**आई :** हतं बस... मायाशेजारी... मी काय सांगते ते नीट कान देऊन ऐक. (तो बसतो.) आता इथून पुढं लहान मुलावानी वागायचं नाई... मी सांगेन ते शिकायचं... कोनी वेडा म्हंगालं तर चिडायचं न्हाई... मारामारी करायची न्हाई... बरं का. साळंच्या बाई सांगत हुत्या... (खोकते.) तुमचा ज्ञानोबा चांगला हाई. वेडा न्हाई. त्याच्यावानी १०% लोक असत्यात जगात. त्यामुळं त्यो काही वेगळा न्हाई. हां... म्हून, घाबरायचं न्हाई. कळलं? (खोकते) (ज्ञानेश हे सगळं मन लावून ऐकत असतो. मानेनच हो–हो म्हणत असतो.)

**आई :** आता इकडं ये... आता हे मडकं मी कसं करती ते बघ. (आई शिकवू लागते. तो थोडा आकार देण्याचा प्रयत्न करतो. पण जमत नाही. तो चिडतो व गोळा फेकून देतो.



देश हाच देव माझा, देश हाचि धर्म आहे। प्रिय माझ्या देशासाठी, सारा माझा जन्म आहे ।।

जरूर वाचा : चिम्पांझींच्या सहवासात – ले. शैलजा देशमुख, चिम्पांझींवर संशोधन करणाऱ्या डॉ. जेन गुडाल यांची कथा, नंदिनी प्रकाशन

प्रायोजक – श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

**ज्ञानेश :** मला न्हाई जमत. नाय करायचं मला... (पाय झाडू लागतो. जवळची काठी घेतो आणि तयार केलेली मडकी फोडायला लागतो.) (आई पटकन उठते आणि ती काठी हिसकावून घेते. त्याला मारायला जाते. तो घाबरून जातो. आईला त्याची दया येते. ती त्याला जवळ घेते.) (रंगमंचावर अंधार. एकपळत्या चालीतलं संगीत इथून पुढे सुरू होतं आणि फ्रेम्स लागतात.)

***फ्रेम – १***

१) आई त्याला भाकऱ्या करायला शिकवतीये. तो तवा दोन्ही हाताने उचलायला जातो. त्याला भाजतं. आई फुंकर घालते. तो रडतो.

***फ्रेम – २***

आई भिंतीला टेकून बसली आहे. त्याचं डोकं आईच्या पायावर आहे. झोपलेला आहे. आई त्याच्या डो यावरून हात फिरवते.

**आई :** देवा, काय म्हणायचं तुझ्या खेळाला? यक ते ज्ञानोबा हुते, ज्यानं ज्ञानेसोरी सांगून समद्यांना शिकीवलं. अन् ह्यो एक माझा ज्ञानोबा हाय ज्याला कसं शिकवावं ते जरा बी कळत न्हाई बघ. तूच त्याला तसं धाडलयसा. तूच तार बाबा त्याला. मला जमलं तेवढं तर म्या करतीच्चे. (हात जोडते, खोकते रंगमंचावर अंधार)

***फ्रेम – ३***

आई ज्ञानेशला पोहायला शिकवतीये.

**ज्ञानेश :** आये, म...ला नाही पोहायचं... भीती वाटती... म्या नाई जानार...

**आई :** ज्ञानू... असं काय करावं. माझ्या बाळा

**ज्ञानेश :** न्हाई...

**आई :** (ज्ञानेशला नदीत ढकलते.)

**ज्ञानेश :** (विंग मधून ओरडतो. जणू काही तो पाण्याच्या आत पडल्याने ओरडायला लागतो.) आये, म्या बुडतोय... आये... आये मी...

**आई :** (काठावरून) पाय मार, आता हात... मार... आरं त्या खोल पाण्यात जाशील. पाय मार...

**ज्ञानेश :** आये...

**आई :** (आई पाण्यात उडी मारते. म्हणजे विंगच्या आत उडी मारते.)

***फ्रेम – ४***

२-३ मुलं खेळत असतात. ज्ञानेश त्यांच्याकडे बघत असतो. तो त्यांच्यात जातो.

**ज्ञानेश :** ए... मला बी घ्या खेळाया...

**मुलगा १ :** सरक... वेडा कुठला... हा खेळ लै अवघडे... तूल नाई यायाचा.

**ज्ञानेश :** घ्या ना.

**मुलगा २ :** आवाज चढवतो. थांब दाखवतूच तूला. (त्याला मारायला लागतो. ज्ञानेश प्रतिकार करत नाही. तेवढ्यात आई येते.)

**आई :** अरे... अरे (आईला बघताच सगळी पोरं पळून जातात.)

**आई :** (ज्ञानेशला उठवते.) लागलं का बाळा?

**ज्ञानेश :** आये, सगळे हसत होते मला, पर म्या चिडलो न्हाई, मारलं बी नाई... तू म्हटलीस तस्साच वागलो म्या... (हसतो.)

**आई :** (त्याच्या डो यावरनं हात फिरवते.) आहेच माझा ज्ञानू शाना.

***फ्रेम – ५***

आई रंगमंचावर आडवी झोपली आहे. ज्ञानेश आणि राधामावशी बाजूला बसून रडत आहेत.

**ज्ञानेश :** मावश्ये आई उठत का नाही गं? आई... आई...

**राधा :** ती देवाघरी गेली राजा.

**ज्ञानेश :** मला बी जायाचं. आई... ऽऽऽ

**प्रवेश – ५**

(नदीच्याच काठावर काही मुलं खेळत असतात. ज्ञानेश बाजूला अगदी उदास चेहऱ्याने बसलेला असतो.



**देशावर माझी भ ती, ही माती माझी माता। हृदयातून येती सूर हे, रोज प्रतिज्ञा गाता।।**

**जरूर वाचा : उद्याच्या सुंदर दिवसांसाठी - ले. नागनाथ कोत्तापल्ले,** जागतिकीकरणामुळे उद्भवणाऱ्या प्रश्नांचा वेध घेणारे, सायन प्रकाशन

**प्रायोजक - श्री. विद्याधर जोगळेकर, पुणे**

मुलांचा दंगा सुरू होतो. खेळताना विटी नदीत पडते.)

**मुलगा १ :** अरं ही विटी पडली की पाण्यात. मी नाई जाणार काढायला.

**आदित्य :** (आदित्य) ए रे... घाबरलास इत यात. मी जातो की...

**मुलगा २ :** जा की मंग.

**आदित्य :** जातो ना. (तो विंग मध्ये जातो. म्हणजे नदीत उतरायला)

**मुलगा १ :** हळूच जा बरं का. पाय घसरून पडशील.

**आदित्य :** (आतूनच) मी नाही घाबरत. आ... आ... आ... गण्या, अरे मी पाण्यात पडलोय नदीत वाचवा... वाचवा...

**मुलगा १ व २ :** (घाबरतात). मला नाही पोहायला येत पोहायला... मला पण नाही... अरे पण... आता काय करायचं? त्यो बुडतोय तिकडं... वाचवा, वाचवा. अरे कोणीतरी धावा, तो आदित्य पाण्यात पडलाय... धावा रं. (लोकांना बोलवायचा प्रयत्न करतात.) ए ज्ञानेशा, तुला येतंय नवं पोहायला...

**ज्ञानेश :** (मानेनच हो म्हणतो.)

**मुलगा १ व ३ :** आरं उठ... वाचव त्याला... (दोघे मिळून त्याला खेचत नेतात.)

**ज्ञानेश :** मी... मी...

**मुलगा १ व ३ :** वाचव त्याला, बुडतोय तो. (असं म्हणत त्याला नदीत ढकलतात.)

**मुलगा १ व ३ :** (किनाऱ्यावरून) हां, शाब्बास रे ज्ञानोबा, मार जरा हात-पाय. थोडं थोडं राह्यलंय आता... जा पुढं जा... धर त्याचा हात... ए... आदि अरे देना त्याला हात. हां, आण आता त्याला किनाऱ्यावर... आण... सावकाश... आदित्यला (असा सगळा गोंधळ किनाऱ्यावर म्हणजे स्टेज वर चालू असतो, तर नदीत म्हणजे विंग मध्ये आदित्यचा 'वाचवा, वाचवा' असा आवाज येत असतो. थोड्या वेळाने ज्ञानेश आदित्यचा हात धरून स्टेज वर प्रवेश करतो. आदित्यच्या नाका - तोंडात पाणी गेल्यामुळे त्याचा तोल जात असतो... तो स्टेज वर पडतो.)

**मुलगा १ व ३ :** (टाळ्या वाजवायला लागतात.) ज्ञानोबा माऊलींचा विजय असो. ज्ञानोबा माऊलींचा विजय असो. (रंगमंचावर अंधार होतो. टाळ्या तशाच वाजत राहतात.) (प्रवेश वर्तमानात उघडतो.) (ज्ञानेश बक्षीस घेण्यासाठी जातो. सर्वजण उभे राहून टाळ्या वाजवतात. तो बक्षीस घेतो. माईकवर बोलायला जातो.)

**ज्ञानेश :** आई... (रडतो.) बघ, मला बी मिळालं बक्षीस! मला आईनं शिकवलं पवायला. आई म्हणायची तू कर... तुला जमेल... तू वेडा न्हाईस... आई आवडते मला. ती म्हणायची. तुला कोणी चिडवलं तरी सगळ्यांना मदतच कर... (डोळे पुसतो.) (सगळे परत टाळ्या वाजवतात.) (शिक्षिका शाबासकी देतात.)

**शिक्षिका :** बघितलंत मुलांनो, प्रयत्न करून ज्ञानेश पोहायला शिकलाच. आणि इतरांनाही मदत करायला तो विसरला नाही. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी आपण नुसतीच वाचतो; पण ज्ञानोबांनी तर ती अंगी बाणली. आपण सगळे त्याचं कौतुक करूया. अजून एक आनंदाची बातमी. आपल्या आजच्या प्रमुख पाहुण्यांनी त्याला दत्तक घ्यायचं ठरवलं आहे. त्याला आता स्वत:चं घर, आई-बाबा मिळतील. आता सगळ्यांचं चांगलं व्हावं म्हणून आपण सगळे पसायदान म्हणू या. (पाठीमागे प्रार्थनेचा आवाज. पडदा पडतो.)

***

**- गायत्री मुळे**
'श्रावण', भिस्तबाग रस्ता,
सावेडी, अहमदनगर 414 003



मान ताठ आपुली, कुणांपुढे न वाकली। वीरता शिवाजीची, नसानसात साठली।।

जरूर वाचा : हात ना पसरू कधी - ले. रवींद्र देसाई, अद्‌भूत सत्यकथा, राजहंस प्रकाशन

श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे, सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

## वसा



माणसाने ढगाला दिला ठोसा
कृत्रिम पाऊस पडलाय भसाभसा
शास्त्रज्ञांनी उचलला प्रगतीचा वसा
रडत राहिलात तर तुम्ही मागेच बसा
कासव जाते पुढे हरला शर्यत ससा
मला व्हायचं श्रीमंत मिळवायचा ढीगभर पैसा

जग आले जवळ जिव्हाळा गमावला कसा
आमच्या पुढच्या पिढीवर पश्चिमेचा ठसा
जरा थांबा बाळांनो, थोडं निवांत बसा
मन ठेवा शांत, आठवा संस्कारांचा वसा
आपल्या माणसांसाठी थोड्या खस्ता सोसा
कष्ट, जिद्द, प्रेम ...अन शेवटास पैसा

**– वंदना धर्माधिकारी**

---



**छात्र प्रबोधनतर्फे मकर संक्रांतीच्या हार्दिक शुभेच्छा !**

उत्तरायण सुरू झाल्यामुळे दिवस कणाकणाने मोठा होऊ लागला आहे. सूर्याचा प्रकाश हा पृथ्वीवर आनंद, तेज निर्माण करणारा आहे. अजूनही थंडी खुणावत आहे. या सर्व वातावरणात तीळ आणि गूळ हे ऊर्जा निर्माण करणारे घटक म्हणजे स्नेह आणि प्रेमभावना वाढवणारे प्रतीक आहेत. चला तर आपसातले हेवेदावे मोडून काढू, निसर्गात भटकंती करू, गूळपोळी, बोरं, आवळे, हलवा, तीळाचे लाडू याचा मनसो त आस्वाद घेऊ. तिळगुळ देऊन, घेऊन एकमेकांना शांती, प्रेम, सद्भावना शुभेच्छा देऊया !

**ज्ञान प्रबोधिनीतर्फे सौर शके १९३६-३७ ची दिनदर्शिका प्रकाशित...**



मूल्य रु. २०/-

**दिनदर्शिकेची वैशिष्ट्ये –**

- राष्ट्रीय सौर दिनदर्शिकेची वैज्ञानिक भूमिका समजावणारा लेख व प्रबोधिनीची संकलित संक्षिप्त माहिती दिली आहे.
- प्रत्येक पृष्ठावर प्रबोधिनीच्या एकेका विभागाची माहिती दिली आहे.
- प्रत्येक चौकटीत सौर, चांद्र, ग्रगोरियन असे तीनही दिनांक दिले आहेत. महत्त्वाच्या दिनविशेषांची नोंद, संकष्टी चतुर्थीच्या चंद्रोदयाची वेळ, नक्षत्र व विविध सण-समारंभ त्या त्या दिवशी चौकटीत दर्शविले आहे.

**छात्र प्रबोधनतर्फे नावीन्यपूर्ण राज्यस्तरीय सांघिक स्पर्धा : २०१४-१५**

(इ. ७वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांसाठी) स्पर्धेसाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही.

✻ **ध्वनिफीत स्पर्धा** (३० मिनिटांची, ४ ते ६ जणांचा गट) ✻ **व्हिडिओ ि लिप स्पर्धा** (३ ते ४ जणांचा गट)
✻ **'तुम्हीच संपादक व्हा!' हस्तलिखित स्पर्धा** (५ ते ८ जणांचा गट) **हस्तलिखित पृष्ठसंख्या ५० ते ५५.**

**सर्व स्पर्धांसाठीचे साहित्य पाठविण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी २०१५**

जय हरित क्रांतिच्या देशा, जय विश्वशांतिच्या देशा। तू नव्या जगाची आशा, जय जय हे भारत देशा।।

**जरूर वाचा : निसर्गवाचन - ले. मारुती चितमपल्ली**, निसर्गजीवनातील अनुभवांवर आधारित, पद्मगंधा प्रकाशन

**प्रायोजक - श्रीमती उमा परांजपे, पुणे**

# प्रतिसादी वाचकवीर व्हा... ९

## हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. छात्र प्रबोधनच्या वासंतिक अंकापासून (चैत्र/एप्रिल) त्या-त्या अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या छात्र प्रबोधनच्या अंकात देत असतो. **या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ फेब्रुवारी २०१४ पर्यंत** 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

**प्रश्नांची उत्तरे लिहा**

१) 'भुताचा वाडा' या कथेतील आनंदचे कोणते गुण तुम्हाला भावतात?

२) वाळवंटी भागात सैनिकी प्रशिक्षण घेताना कोणत्या नैसर्गिक अडथळ्यांचा सामना सैनिकांना करावा लागतो?

३) पानगळ झाली तरी झाडाला इजा पोहचू नये, म्हणून झाड निसर्गत: स्वत:ची काळजी कशी घेते?

४) शाळेत असताना दुपारी चार वाजण्याची वेळ लेखक मल्हार अरणकल्ले आणि त्यांच्या वर्गातील मुलांना का आवडत असे?

५) टि.व्ही. वरील जाहिरातींची कोणती वैशिष्ट्ये 'सुंदर फसवी गंमत' या कवितेत कवयित्रीने मांडली आहेत?

## ✻ हार्दिक अभिनंदन ✻



विख्यात खगोलशास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. जयंत नारळीकर यांना साहित्य क्षेत्रातील प्रतिष्ठेचा **साहित्य अकादमी पुरस्कार २०१४** जाहीर झाला आहे. 'चार नगरांतले माझे विश्व' या आत्मकथनपर ग्रंथासाठी त्यांना हा सन्मान मिळाला आहे.

यक्षाची देणगी, वामन परत न आला, व्हायरस, अंतराळातील भस्मासूर, टाईम मशीनची किमया, आदी पुस्तकांमुळे त्यांचा खास वाचकवर्ग निर्माण झाला आहे. 'छात्र प्रबोधन' मासिकामध्ये कुमार वयोगटासाठी अनेक विज्ञान-कथा तसेच कुमारांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणारे लेख त्यांनी लिहिले आहेत.

**'छात्र प्रबोधन'तर्फे मन:पूर्वक अभिनंदन !**

**नोंद घ्या...**

## छात्र प्रबोधन - वर्गणीतील बदल

कागद, छपाई यांचे दर सातत्याने वाढत आहेत तरीदेखील गुणवत्तेत कोणतीही तडजोड न करता श य तेथे काटकसर करत गेली पाच वर्षे आपण वार्षिक वर्गणीत कोणताही बदल केला नाही. छात्र प्रबोधनची वाटचाल दीर्घकाळ चालू राहाण्यासाठी यापुढे वर्गणीतील वाढ अपरिहार्य आहे.

**सौर पौष शके १९३६/जानेवारी २०१५ पासून मासिकाची वर्गणी खालीलप्रमाणे असेल**

**वार्षिक वर्गणी ₹ २००/-, द्वैवार्षिक - ₹ ४००/-, त्रैवार्षिक - ₹ ५५०/-, दशवार्षिक ₹ १७००/-**



हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ पौष, शके १९३६, १ जानेवारी २०१५ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

वैजनाथ दुलंगे/मधुजा पारगावकर



सौर पौष, शके १९३६/जानेवारी २०१५ पंजीकृत नियतकालिक, ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर ११ पौष, शके १९३६ /१ जानेवारी २०१५
पंजीकरण क्रमांक (RNI NO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 /2015 - 2017,
तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक : WPP- 21.Published & Posted at S.P. Post Office On 1st of Every Month



**हिरवी राने पिंगट धरती, आकाशाचा रंग निळा ।**
**अवघे त्याचे रंग कवळूनी, मी तर झालो रंगखुळा ।।**

तुम्ही पावसाळ्यानंतर भल्या पहाटे डोंगर उतारावर गेलात तर अशा प्रकारचा फोटो तुम्हालाही काढता येईल. या फोटोसाठी ३५-१३५ मि.मि.ची निकॉनची लेन्स वापरली आहे.

**– प्रकाश जोगळेकर, दत्तवाडी, पुणे**

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

सौर दिनदर्शिका
शके १९३६

| | जानेवारी २०१५ | पौष माघ |
|---|---|---|
| गु. | 1 | ११ |
| शु. | 2 | १२ |
| श. | 3 | १३ |
| र. | 4 | १४ |
| सो. | 5 | १५ |
| मं. | 6 | १६ |
| बु. | 7 | १७ |
| गु. | 8 | १८ |
| शु. | 9 | १९ |
| श. | 10 | २० |
| र. | 11 | २१ |
| सो. | 12 | २२ |
| मं. | 13 | २३ |
| बु. | 14 | २४ |
| गु. | 15 | २५ |
| शु. | 16 | २६ |
| श. | 17 | २७ |
| र. | 18 | २८ |
| सो. | 19 | २९ |
| मं. | 20 | ३० |
| बु. | 21 | मा. १ |
| गु. | 22 | २ |
| शु. | 23 | ३ |
| श. | 24 | ४ |
| र. | 25 | ५ |
| सो. | 26 | ६ |
| मं. | 27 | ७ |
| बु. | 28 | ८ |
| गु. | 29 | ९ |
| शु. | 30 | १० |
| श. | 31 | ११ |

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

**या अंकाची किंमत : ₹ २०/-**
**वार्षिक वर्गणी : ₹ २००/-**

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाड या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (→) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -